वर्ष : १ अंक : २

# सादर


फेब्रुवारी २०१८







महिलांना तीन वर्षांसाठी भविष्य निर्वाह निधी कपात ८ टक्के दराने

१० कोटी गरीब कुटुंबांना पाच लाख रुपयांपर्यंतची आरोग्य विमा सुविधा मोफत





७० हजार कोटी रुपये महिला बचतगटांना कर्जासाठी तरतूद

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य



**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य




**विंदा कीर्तीकर**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
(म्हाडा इमारत)
कलानगर, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक
वसाहत, एस. जे. मार्ग,
लोअर परळ, मुंबई-४०० ०१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**स्वागत मूल्य : ₹ १०**

**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## नव्या संकल्पाच्या मार्गावर

जानेवारी महिन्याचा शेवटचा आठवडा महाराष्ट्र राज्य महिला आयोगासाठी अत्यंत संस्मरणीय होता. आयोगाच्या स्थापनेचा रौप्य महोत्सव मुंबईत दिमाखदार कार्यक्रमात साजरा करण्यात आला. त्याच बरोबर आयोगाचे मुखपत्र असलेल्या 'साद' या मासिकाचे प्रकाशनही झाले. 'साद' ही खरे तर माझ्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याची बाब आहे. कारण, या निमित्ताने दरमहा आपल्याशी सुसंवाद साधण्याची संधी मला उपलब्ध होणार आहे. हा संवाद एकतर्फी होऊ नये, असाच प्रयत्न राहील. आपण आपल्या समस्या, मनोगत माझ्यापर्यंत जरूर पोहोचवाल, अशी आशा करते.

महिलांच्या समस्यांना वाचा फोडणे हे आयोगाचे मुख्य काम, पण यापेक्षाही अधिक महत्त्वाचे मला वाटते ते महिलांचे सक्षमीकरण. ते केवळ आर्थिक नव्हे, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि अगदी शारीरिकसुद्धा होणे आवश्यक आहे. याच दृष्टीने प्रयत्न राहण्याची ग्वाही मी आपल्याला 'साद'च्या व्यासपीठावरून देत आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प नुकताच जाहीर झाला आहे. प्रथमच थेट दिल्लीच्या पातळीवरून महिलांसाठी भरीव तरतूद असणारा अर्थसंकल्प मांडला गेला. नव्यानेच नोकरीत रुजू झालेल्या महिलांच्या पगारातून पहिल्या तीन वर्षांसाठी आठ टक्के दराने भविष्य निर्वाह निधी कपात केली जाईल. त्यामुळे हातात येणारा पगार वाढून ओढगस्तीने घरखर्च करणाऱ्या महिलांना दिलासा मिळेल, आणि त्यांची क्रयशक्तीही वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेतही चलनवलन सुरू राहील. गरीब महिलांच्या मागील चुलीचा त्रास सुटावा यासाठी त्यांना गॅस जोडणी मोफत देणाऱ्या उज्ज्वला योजनेची व्याप्ती वाढवून आता आठ कोटी महिलांपर्यंत ही योजना पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. स्त्रियांच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. चुलीच्या धुरामुळे त्रास होऊन डोळ्यांचे आजार मागे लागणाऱ्यांनाच त्यातील वेदना समजू शकतील. महिला बचतगटांना कर्जरूपाने वाटप करण्यासाठी ७० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मर्यादित साधनसामग्रीच्या आधारे व्यवसायाचे प्रयत्न करणाऱ्या बचटगटांना यातून मदतीचा हात मिळेल. राज्य सरकारचाही अर्थसंकल्प येत्या काही दिवसांत जाहीर होईल, त्यातही महिला सक्षमीकरणावर विशेष लक्ष दिले जाईल, अशी आशा मला वाटते.

शंभर-दीडशे वर्षांपूर्वीचा विचार करता आजची स्त्री नक्कीच अधिक शिक्षित आहे, सक्षम आहे, पण याचा अर्थ समाजातील तिचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे झाले आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालातील एक निष्कर्ष लक्षवेधी आहे. सुमारे ८० टक्के जोडप्यांना आपल्याला किमान एक तरी मुलगी असावी, असे वाटते. माझ्या दृष्टीने ही बाब नक्कीच स्वागतार्ह आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्याबरोबरच त्यांचे समानीकरण करणे ही अचानक घडणारी गोष्ट नाही, त्यासाठी अजून आपल्याला बराच पल्ला गाठायचा आहे. कामे खूप करायची आहेत, त्यासाठी वेळ पुरेल की नाही, अशी शंका काही वेळा मनाला स्पर्शून जाते. काम पूर्ण करण्याच्या दिशेने प्रयत्न करीत त्या मार्गावर पुढे जाणे आपल्या हातात आहे, आणि आपणा सर्वांच्या साथीने मी आणि राज्य महिला आयोग या दिशेने नक्कीच प्रयत्नशील राहू. जागतिक महिला दिन येतो आहे. आपणा सर्वांना शुभेच्छा आहेतच, या निमित्ताने एक संकल्प करू या स्त्रीचे सक्षमीकरणाबरोबरच स्त्री समानीकरण.

**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

**वाचकांना निवेदन** 'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.

# अंतरंग...



अनाथ मुलांसाठी आरक्षण देण्याचा एक मोठा आणि अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर इतर राज्यांनीही या प्रकारचा कायदा करावा. १८ वर्षांवरील ३२ लाख मुले असून, त्यांच्या भविष्याशी आपल्याला खेळ येणार नाही.

## अनाथांच्या नाथा...

पान ५



## भविष्याचे तारण

राजकारणाची बदनामी थांबवायची तर महिलांची भागीदारी पुरुषांनी हिमतीने स्वीकारली पाहिजे. पक्षांनीही त्यांना निर्णयप्रक्रियेत घेतलेच पाहिजे. राजकारणातील महिलांची भागीदारी धारदार व्हायची तर, पक्ष तिकीट कमिट्यांमध्ये त्यांना घेतलेच पाहिजे. कारभारात मदतीच्या नावाखाली त्यांच्यावर मालकी दाखवता कामा नये.

पान ९

## मुलांच्या विश्वात जा

स्त्रीला आई म्हणून मुलाला समजून घेण्याचे निसर्गतः मिळालेले कौशल्य खूप चांगल्या पद्धतीने वापरणे गरजेचे आहे. या नैसर्गिक देणगीचा आस्वाद घेताना गरज असते ती फक्त मुलांना आपल्या पालकांच्या विश्वात न आणता आपण मुलांच्या विश्वात जाऊन त्यांना समजून घेण्याची.



पान १३

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा वर्धापन दिन उत्साहात; 'साद'चे थाटात प्रकाशन



पान १६



# अनाथांच्या नाथा....

अनाथ मुलांसाठी आरक्षण देण्याचा एक मोठा आणि अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर इतर राज्यांनीही या प्रकारचा कायदा करावा. १८ वर्षांवरील ३२ लाख मुले असून, त्यांच्या भविष्याशी आपल्याला खेळ येणार नाही.


## विजया रहाटकर
अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग


अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा राज्य सरकारचा निर्णय अत्यंत संवेदनशील असाच म्हणावा लागेल. राज्यातील अनाथ मुलांना यापुढे सरकारी नोकऱ्यांमध्ये खुल्या प्रवर्गात एक टक्का आरक्षण देण्यात येणार आहे. राज्य महिला आयोग आणि अध्यक्ष म्हणून वैयक्तिकरित्या मी या निर्णयाचे स्वागत करते.

महाराष्ट्र एक प्रगतीशील राज्य असून, राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक आहे. तसेच, तो सर्व देशासाठी दिशादर्शक आहे. महिलांचे सक्षमीकरण आणि कल्याण यासाठी काम करणारी कार्यकर्ती या नात्याने हा निर्णय माझ्यासाठी नक्कीच स्वागतार्ह आहे. महाराष्ट्राचे अनुकरण करीत उत्तराखंड सरकारनेही अनाथ मुलांसाठी आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे, हे येथे आनंदाने मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

कोणतीही मोठी गोष्ट अचानक घडत नसते. त्या मागे अनेक वर्षांचे परिश्रम, संघर्ष असतो. आजवर या अनाथ मुलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी अनेक अडचणी आल्या असतील, मात्र व्यवस्थेच्या असंवेदनशीलपणामुळे त्या दुर्लक्षित, उपेक्षित राहिल्या. हा कायदा होण्यासाठी तत्कालिक कारण ठरली ती राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही नोकरी गमावण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेली अमृता करवंदे.

अमृता राज्य लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) परीक्षेत उत्तीर्ण झाली होती. मात्र, फक्त एक गुण मिळाल्यामुळे तिला खुल्या प्रवर्गातून नोकरी मिळत नव्हती. जात प्रमाणपत्राअभावी तिला राखीव जागेचाही लाभ घेता येत नव्हता. अमृताला खुल्या प्रवर्गातून नोकरी द्यावी की राखीव जागांवर तिची नियुक्ती करावी, या बाबत बरीच चर्चा झाली. आपली समस्या अमृताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही कानावर घातली.



हा मुद्दा त्या वेळी माध्यमांतही मोठ्या प्रमाणावर चर्चिला गेला. अनेक वृत्तवाहिन्यांनी अमृताला चर्चेसाठी बोलावले होते. काही ठिकाणी मी देखील चर्चेमध्ये सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांनी माझी व्यथा अत्यंत सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतली, असे अमृताने सांगितले होते. या चर्चेबाबत आशावादी असल्याचेही तिने सांगितले.

त्यानंतर काही दिवसांनीच पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, अनाथ मुलांना त्यांच्या आई-वडिलांविषयी काहीच कल्पना नसते. त्यामुळे त्यांच्यासाठी वेगळा प्रवर्ग असणे आवश्यक आहे,



असे मला वाटते. या बाबत मी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, या मुलांसाठी वेगळा प्रवर्ग तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर अवघ्या आठवडाभरातच अधिकृतरित्या हा निर्णय घेतला गेला. त्यामुळे अमृताच्या म्हणण्याला पुष्टीच मिळाली.

हा निर्णय अनाथ मुलांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मुलांचा संघर्ष आज-कालचा नाही. स्वतंत्र भारताचा इतिहास जेवढा जुना आहे, तेवढाच हा संघर्षदेखील जुना आहे. आई-वडिलांचे छत्र गमावलेल्या या मुलांना (काही मोजक्या) पुढे कदाचित आधार मिळतो, पण आयुष्य सावरण्याची संधी कमीच मिळते. एखाद्या अनाथश्रमात राहिल्यानंतर पुढे त्यांना वणवण करावी लागते. वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर या मुलांना अनाथाश्रम सोडून आयुष्यातील संघर्षाला फार लवकर तोंड द्यावे लागते. त्यातून ही मुले अनाथ असल्यामुळे त्यांची जात कोणती, हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर उभा असतो. जातिअभावी त्यांना आरक्षणाचा लाभ मिळू शकत नाही. आता राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे या मुलांची वणवण थांबेल. जात नाही, म्हणून या मुलांना नोकरीपासून, शिक्षणापासून वंचित राहावे लागणार नाही.

अनाथ मुलांच्या कल्याणासाठी राज्य सरकारने गेल्या वर्षीही एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला होता. एक वर्षाच्या आतील अनाथ बालक दत्तक घेणाऱ्या महिलांना १८० दिवसांची मातृत्व रजा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गेल्या वर्षीच्या राज्य अर्थसंकल्पाआधीच या निर्णयाचा शासनादेश (जीआर) काढला होता. या सुविधेचा लाभ हवा असल्यास मूल सरकारी अनाथाश्रमातूनच दत्तक घ्यावे लागेल, अशीही अट होती.

आरक्षण हे अनाथ मुलांचे पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने केवळ पहिले पाऊल आहे, असे मी येथे स्पष्ट करू इच्छिते. आरक्षणामुळे या मुलांच्या पुनर्वसनाला गती मिळेल. मात्र, त्याही पलीकडे जाऊन समाजाला या मुलांप्रति मोठी भूमिका बजावावी लागेल. त्यांना सामावून घ्यावे लागेल. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत सरकारी का असेना बालगृहाच्या छत्रछायेत राहणारी ही मुले अठराव्या वर्षानंतर एकाएकी आधारहीन होतात. या मुलांना नंतर तिथे राहण्याची परवानगी नसते. अशा मुलांकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. अठराव्या वर्षानंतर सरकारी यंत्रणा त्यांना दूर करतात आणि जगाचे रीती-रिवाज माहीत नसलेले हे नवतरुण मुले-मुली त्या निष्ठूर व्यवहारात दिशाहीन फेकले जातात. त्यांचे स्थायी घर नसल्यामुळे अनेकांना आधार कार्ड काढता येत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सरकारच्या लेखी या मुलांचे कोणतेही कागदोपत्री अस्तित्व नसते. त्यामुळे या मुलांना आधार कार्ड काढण्यातील अडचणी तातडीने दूर करणे आवश्यक आहे.

अनाथाश्रमातून मुलांना बाहेर पाठविण्यासाठीची वयोमर्यादा १८ वरून २१ वर्षे करता येईल का, या बाबत सर्वच पातळ्यांवर विचार होण्याची आवश्यकता आहे. मुले ही देशाचे भविष्य आहेत, असे आपण मानतो. या न्यायाने प्रत्येक मुलाला आई-वडील, कुटुंब आणि समाज यांचे प्रेम मिळविण्याचा मूलभूत अधिकार आहे. आपल्या देशात १८ वर्षांवरील अनाथ मुलांची संख्या ३२ लाख असावी, असा एक अंदाज आहे. इतक्या मोठ्या संख्येने असलेल्यांना आपण उपेक्षित आणि वंचित ठेवू शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्राचे अनुकरण इतर राज्यांनीही करावे, अशी माझी त्यांना विनंती आहे. प्रत्येक राज्याचा महिला आणि बाल आयोगाने त्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी.

त्याही पुढे जाऊन, या मुलांच्या पुनर्वसनासाठी समाजाला मोठी भूमिका बजावावी लागेल. अनेक स्वयंसेवी संस्था या साठी कार्यरत आहेत, पण समस्येची क्लिष्टता आणि गांभीर्य लक्षात घेता त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. समाजाने या मुलांसाठी मदतीचा हात पुढे करावा, अशी माझी नम्र विनंती आहे.

**ब्लॉग संपर्क :** **vijayarahatkar.wordpress.com**



# महिलांसाठीही ‘अर्थ’पूर्ण संकल्प

**अर्थसंकल्प म्हणजे अर्थव्यवस्थेच्या दमदार प्रवाहातला एक टप्पा. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पातून महिलांना काय मिळणार, याचा घेतलेला वेध.**

सीए अजित जोशी
meeajitgmail.com

प्रत्येकाला घरखर्चाचा ताळमेळ ठेवताना काहीतरी नियोजन करावेच लागते. सरकारही याला अपवाद नाहीच. फक्त त्यात एक महत्त्वाचा फरक आहे. तुमच्या आमच्या नियोजनाची सुरुवात आपले उत्पन्न किती, येथून होते. सरकारला मात्र तसे करता येत नाही. कारण सरकारला देशवासीयांच्या संरक्षण आणि विकासासाठी कोणतीही तडजोड न करता खर्च करावा लागतो. तेव्हा सरकार आपल्या खर्चाचा अंदाज घेते, करातून तेवढा पैसा उभा करायचा प्रयत्न करते आणि तरीही निधी कमी पडला तर कर्जाऊ रक्कम उभी करून ही तूट भरून काढते. त्याचबरोबर, आधी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीचा आणि कर्मचारी आणि इतर सोयीसुविधांवरील नेहमीच्या वार्षिक खर्चाचाही विचार सरकारला करावा लागतोच. तेव्हा अर्थसंकल्प, असे भारदस्त नाव असलेला हा कार्यक्रम म्हणजे एका अर्थाने सरकारचा वर्षभर खर्च काय ठरला आहे आणि त्यासाठी पैसा सरकार कुठून आणणार आहे, याचा हिशेब असतो. मात्र जागतिकीकरणानंतर एकूण अर्थव्यवस्थेच्या प्रवाहाला एक ठोस दिशा आलेली आहे. या दिशेने जाताना अर्थसंकल्प काही फार मोठी वळणे घेऊ शकत नाही. साहाजिकच अर्थसंकल्पामध्ये बहुतेकदा आधीच्या योजनांवर नव्याने तरतूद असते. आधीच्याच करांत थोडाफार फेरफार केलेला असतो आणि एकूण अर्थव्यवस्थेसोबत खर्च आणि कमाईचे आकडे वाढत असतात. मात्र या सगळ्यातही सरकार दरवर्षी काही चाकोरीबाहेरच्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करतेच. पंतप्रधान संशोधक ‘फेलो’ शोधून त्यांच्या पीएचडीसाठी स्कॉलरशिप द्यायला १००० कोटींची तरतूद, हीही अशीच आवर्जून दखल घेण्याची बाब आहे. आपण या अर्थसंकल्पात अशा कोणत्या गोष्टी आहेत त्याचा वेध घेऊ.

अर्थसंकल्पातली सर्वांत महत्त्वाची घोषणा ही सगळ्यांना परवडू शकेल अशा आरोग्यसेवेची होती. मात्र ही आरोग्यसेवा कशी काम करेल? प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपये हातात दिले जातील का? असे बरेच प्रश्न अनेकांना पडले होते. यथावकाश या योजनेविषयीचे सविस्तर स्पष्टीकरण येईलच, तरी अशा स्वरूपाच्या सरकारी आरोग्यविमा योजना कशा चालतात, हे समजून घेणे उद्बोधक ठरेल. सहसा अशा योजनांत सरकार विम्याच्या प्रीमियमची रक्कम इन्शुरन्स कंपनीला देते. एकूण किती लोकांना विमा संरक्षण द्यायचे आहे, या वरून हा प्रीमियम ठरतो. ज्या व्यक्तीला आरोग्यसेवा हवी असेल, तिने मान्यताप्राप्त हॉस्पिटलमध्ये जाऊन या योजनेखाली आपल्याला लाभ घ्यायचा असल्याचे सांगायचे. मग हॉस्पिटल त्या रुग्णाचा खर्च उचलून तो विमा कंपनीकडून वसूल करते. यात आरोग्यसेवेची

देखभाल करून खर्चाचा योग्य तो विनिमय होतोय, हे पाहण्यासाठी 'टीपीए', अर्थात 'थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटर'ची नेमणूक होते. अशा प्रकारे ही योजना म्हणजे एक प्रकारची अधिकाधिक आणि खासकरून आर्थिकदृष्ट्या कमकुवत जनतेला विम्याच्या छत्राखाली आणण्याचा प्रयत्न असेल. बऱ्याचशा पाश्चिमात्य देशांत आढळणारी ही योजना यशस्वी झाली की भारतीय समाजात एक मोठी विकासात्मक आर्थिक क्रांती ठरेल.

शेती, हा सगळ्याच सरकारांचा प्राधान्यक्रम असतो. साहाजिकच शेतीवरच्या खर्चात प्रतिवर्षी वाढ होतच राहते. शेतमालाला खर्चाच्या ५० टक्के अधिक भाव, शेतमालाचे बाजार वाढवणे आणि ते इलेक्ट्रोनिक मार्गांनी जोडणे, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, शेतमाल उत्पादक कंपन्यांना करमुक्ती अशा अनेक गोष्टी सरकारने त्या दृष्टीने घोषित केल्या. पण एक वेगळ्या धाटणीची, धोरणात्मक योजना म्हणजे ज्या भूभागात ज्या पिकाचे उत्पादन अधिक आहे, तिथे त्याच्या विकासासाठी क्लस्टर फार्मिंग ही कल्पना. यामुळे शेतीवरील खर्च सरसकट न होता, नेमका आणि जास्त उत्पादनक्षम होईल, अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे भाज्या, बांबू अश्या थोड्या वेगळ्या शेतमाला प्रोत्साहन दिलेले आहे.

प्रत्येक घरात संडास, चोवीस तास वीज आणि किमान श्रमात स्वयंपाकाचं इंधन, अर्थात गॅस या प्रत्येक संसारी व्यक्तीच्या आणि खासकरून स्त्रियांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. या तिन्ही गोष्टींवर अनेक वर्षं सरकार काम करत आहेच. याही वर्षी मोफत गॅसजोडणीच्या उज्वला योजनेत ८ कोटी कुटुंबांपर्यंत पोचावे, मुबलक वीज यावी या करिता १६००० कोटी रुपये खर्च करावे आणि २ कोटी अधिक संडास 'स्वच्छ भारत' योजनेत बांधावे, असे सरकारचे नियोजन आहे.

महिला बचत गट, ही स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या मोहिमेतली एक अतिशय महत्त्वाची चळवळ आहे. आवर्जून नोंद करण्याची गोष्ट म्हणजे सरकारचा विचार असा आहे की, या गटांना मिळालेल्या कर्जाचा आकडा हा २०१६-१७ च्या ४२,५०० कोटी रुपयांवरून ७५,००० कोटी रुपयांवर जावा. त्याचप्रमाणे स्त्री कर्मचारी असल्यास तिच्या पहिल्या तीन वर्षांच्या नोकरीच्या काळात तिला नोकरदार भविष्यनिधीत पुरुषांप्रमाणे स्वतःच्या पगाराच्या १२ टक्के रक्कम द्यावी लागणार नाही. तर ८.३३ टक्के रक्कम देऊनही चालेल. मालकाला मात्र स्वतःच्या तिजोरीतून १२ टक्केच द्यावी लागेल. यातूनच स्त्रीच्या हातातली खेळती रक्कम वाढेल.

करांच्या प्रस्तावात फार फरक नाही. आता जीएसटी हा विषय अर्थमंत्रालयाच्या अखात्यारीतून जीएसटी कौन्सिलकडे गेलेला आहे. त्यामुळे त्यात काही फरक पडायचा प्रश्नच नाही. इतर फारशा गोष्टींवर करवाढ नाही. फक्त आयात केलेल्या इलेक्ट्रोनिक वस्तू, खासकरून मोबाईलवर, ५ टक्के आयात शुल्क वाढलेले आहे. व्यक्तिगत करांवरील सेस एका टक्क्याने वाढलेला आहे. मात्र सेस हा करांवर कर असतो. त्यामुळे त्याचा फार प्रभाव होत नाही. उदा. बचतीची गुंतवणूक वजा करता आठ लाख रुपये उत्पन्न असेल, तर त्यावर रुपये ७२,५०० कर आणि रुपये २१७५ सेस होता. आता मात्र एक टक्का वाढून तो रुपये २९०० एव्हढा असेल. थोडक्यात दर दहा हजार रुपयांमागे साडेनऊ रुपये, इतकी ही माफक करवाढ ठरेल. त्याचप्रमाणे शेयर बाजारात शेअर किंवा म्युच्युअल फंडाची युनिट्स घेऊन जे ती एका वर्षानंतर विकतात, त्यांना त्यातल्या नफ्यावर करमाफी होती. आता ती करमाफी फक्त एक लाख रुपयांपर्यंत झालेल्या फायद्यावर असेल. त्याच्यापुढे १० टक्के कर लागेल.

अर्थसंकल्प म्हणजे अर्थव्यवस्थेच्या दमदार प्रवाहातला एक टप्पा. त्या प्रवाहाच्या वळणावर क्षणभर थांबून तो प्रवाह कुठून आलाय आणि कुठे जाणार आहे, याचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न म्हणजे अर्थसंकल्प. विकासाच्या, आनंदाच्या, समृद्धीच्या सुजलाम सुफलाम भूमीत हा प्रवाह वाहत राहो, हाच खरा 'अर्थ'पूर्ण संकल्प...!

## दृष्टिक्षेपात महिलांसाठी अर्थसंकल्प...

- नव्यानेच रुजू झालेल्या महिला कर्मचाऱ्यांना पहिल्या तीन वर्षांसाठी भविष्य निर्वाह निधी ८ टक्के दराने कपात
- कंपनी वा सरकारचा हिस्सा मात्र १२ किंवा १० टक्के असणार
- आरोग्य सुरक्षा योजनेंतर्गत गरीब वर्गातील १० कोटी कुटुंबांना पाच लाख रुपयांपर्यंतची आरोग्य विमा सुविधा मोफत
- २४ नवी सरकारी हॉस्पिटल उभारण्यात येणार
- उज्वला योजनेची व्याप्ती वाढविण्यात येणार
- ही योजना आठ कोटी कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यात येणार
- महिला बचतगटांसाठीच्या कर्जात ७० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढ. ही तरतूद गेल्या वर्षीपेक्षा ३७ टक्क्यांनी अधिक
- सर्व महिला, निराधार मुले, यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा आणि संरक्षणासाठी भरीव तरतूद
- स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत २ कोटी नवी शौचालये बांधण्यात येणार
- सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन. महिला बचत गटांना सेंद्रिय शेतीकडे वळण्यासाठी प्रोत्साहित करणार



# भविष्याचे तारण



**राजकारणाची बदनामी थांबवायची तर महिलांची भागीदारी पुरुषांनी हिमतीने स्वीकारली पाहिजे. पक्षांनीही त्यांना निर्णयप्रक्रियेत घेतलेच पाहिजे. राजकारणातील महिलांची भागीदारी धारदार व्हायची तर, पक्ष तिकीट कमिट्यांमध्ये त्यांना घेतलेच पाहिजे. कारभारात मदतीच्या नावाखाली त्यांच्यावर मालकी दाखवता कामा नये.**

## भीम रासकर

स्थानिक स्वराज्यात महिलांना ५० टक्के आरक्षण, हा बॉंब सत्ताधारी पुरुषी वर्गाच्या पोटात गोळा यायला पुरेसा होता. नुकत्याच स्थानिक निवडणुका पार पडल्या. नव्याने निवडून येणाऱ्या मॅडम डोईवर बसणार ही भीती साऱ्यांनाच वाटत होती.

एका कार्यक्रमात भाषणावेळी एका माजी महिला खासदारांनी कढीपत्त्याची कहाणी सांगितली- नुकतीच दिवाळी संपली होती. चिवडा तयार करताना आपण कढीपत्ता धुवून-पुसून चिवड्यात वापरतो; परंतु जेवणाचा आस्वाद घेतांना, कढीपत्ता बाजूला ठेवला जातो. जी अवस्था कडीपत्त्याची, तीच अवस्था बाईची. परिवार असो की पक्ष, नेमक्या निर्णयाच्या वेळेला कढीपत्त्यासाखी बाई बाहेर!

या उलट पुण्यात झालेल्या नगरसेविकांच्या कार्यशाळेतील एक प्रसंग नवा संदेश देणारा ठरला. कार्यशाळेच्या समारोपाला आलेल्या माजी पुरुष महापौरांनी ५० टक्के महिला आरक्षणाचे कौतुक तर खूप केले. शेवटी त्यांनी षटकार ठोकलाच. ते म्हणाले, आता सर्व महानगरपालिकांमध्ये ब्युटी पार्लर सुरू करायला हरकत नाही. निम्म्या महिला या भवनात येणार तर त्यांची ती गरज आहे. सर्व नगरसेविकांनी या विधानाला टाळ्या वाजवून दाद दिली; परंतु संयोजिकाही भारी होत्या. त्यांनी पुरुषांसाठीही एक पार्लर उघडायचे सुचवले. 'पुरुषांचे चेहरेही उजळले तर आम्हा सर्वांनाच आवडेल... असं म्हणून त्यांनीही डबल टाळ्या मिळविल्या.'

निम्मे आरक्षण महिलांना? मग आमचे काय? या धास्तावलेल्या वातावरणात चेहऱ्यावर हसू व खासगीत आपण आता फसू, ही पुरुष पुढाऱ्यांची भावना लपता लपत नव्हती.

एक तृतीयांश आरक्षण असताना पक्ष व पक्षपुढारी इतके संवेदनशील (?) दिसले नव्हते, परंतु आता ५० टक्के आरक्षण लागू झाल्यानंतर 'मॅडम' म्हणण्यातील ताल, लय, नादही भन्नाट बदलत आहे. कधी-कधी 'मॅडम' हे कौतुकाचे संबोधन आहे की शिवी हासडल्यासारखी बोलावण्याची पद्धत आहे; असा विचित्र प्रश्न महिलांना पडतो.

काही मोजक्या पुढारी मंडळींना मात्र ५० टक्के महिला आरक्षणाचा खूप अभिमानही वाटतो. आरक्षणास मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्राच्या पक्षांतर्गत महिला संघटनांसोबत व नवराजकारणप्रेमी स्वयंसेवी संस्थांसोबतही चर्चा झाल्या. खास करून प्रथमच पक्षांनीही आमचा महिला राजसत्ता आंदोलनाचा



अनुभव सांगायला प्रेमाने बोलावले. सामाजिक संस्थांनी, महिलांनाही राजकारण शिकविण्यासाठी निमंत्रित केले. काही कार्यकर्त्या महिलांनी तर निवडणूक कशी लढायची, याची पूर्वतयारी करायला मदत मागितली. काही लढलेल्या, हरलेल्या व थोड्या जिंकलेल्या महिलांनी अनुभव लिहून काढले. काही जणींनी ते शिबिरात मोकळेपणाने मांडले.

आरक्षण हा महिलांचा अधिकार आहे, असे वातावरण व मन तयार व्हायला वेळ लागेल; परंतु आजपर्यंतची गुंतवणूक व कामाचे फळ मिळालेच पाहिजे- हा पुरुष पुढाऱ्यांचा समज पक्का आहे. याचा अर्थ सत्य व सत्तेची पूर्ण फारकत झालेली नाही. महिलांनाही सत्तेजवळ सत्याला घेऊन जाताना वेडीवाकडी वळणे आहेतच की! सुखासुखी प्राप्त होईल ती सत्ता कसली? तर त्यातील नवनवीन आव्हाने कोणती? कारभारणी निवडून येण्याआधी उमेदवारी ठरविण्यात तरी त्या शंभर टक्के असतातच याची हमी नाही. त्यांच्या कामातून व प्रेरणेतून त्या निवडणूकीला उभ्या राहिल्या तर चित्र खूपच वेगळे व आशादायी असते.


निवडणुकीत पडेल मतदारसंघ म्हणजे ताईंचा मतदारसंघ! हे सूत्र पुढाऱ्यांनी शोधले. आरक्षण पडल्यावर 'यशाची खात्री' हा निकष पक्षासाठी खूप महत्त्वाचा असतो. सभागृहात आपली मागणी लावून धरायची तर बहुसंख्येची गरज असते. त्यामुळे नव्याने उमेदवारी मागणाऱ्या महिला वॉर्डात काम छान करीत असतील, परंतु त्यांच्याकडे निवडणूक जिंकण्याची क्षमता नसेल तर पक्ष ती तसदी घेऊ इच्छित नाही.

प्रत्यक्षात ३३ टक्के आरक्षणानंतरही गेल्या पंधरा वर्षातील कारभारणींची कामगिरी अजिबात निराशाजनक नव्हती. म्हणून तर निम्मे आरक्षण मिळाले. शिवाय संसद, विधानसभांतही महिलांना एक तृतीयांश आरक्षण मिळेल, अशी खात्री आहे. त्यामुळे महिलांचे कर्तृत्व हे पुरुषी नेतृत्वाला पचायला थोडा वेळ लागेल हे खरे. महिला राजसत्तेत आल्याबरोबर त्यांनी भर्रकन जादूची कांडी फिरवून मागचा सर्व विनाश नष्ट करावा हे कसे शक्य आहे? त्या विकासाचा अजेंडाच पुढे घेऊन जात आहेत, हे सांगायला कुणा संशोधकाची गरज नाही; परंतु बाईने जातीचेही राजकारण करावे, पैशातही खेळावे, पक्षालाही पूर्ण बांधून घ्यावे व गरीब वर्गाचा झेंडा नावापुरताच खांद्यावर घ्यावा, विकासाला जमल्यास वेळ द्यावा किंवा महिलांच्या प्रश्नाला वाचा फोडावी या अपेक्षांचा निर्णायक धनी कोण? महिला नगराध्यक्ष किंवा सरपंच भ्रष्टाचारी असणार नाही, ही धारणा कोणाची? तिने भ्रष्टाचार करू नये हे खरे, परंतु बाई असून पैसे खाते! हे मत कधी, कोणी, कसे तयार केले? ती सुद्धा याच समाजात वावरते, निरीक्षणे करते व शिकते. बाई म्हणून तिला वेगळा न्याय व बाप्यांवर मनमानीच्या सवलतीची खैरात, का बुवा? तिला चुका करायची परवानगी नाहीच का?

'राजकारण बदलाया- राजकारणात या,' ही नीती मान्य असेल तर बाईला राजकारणात यायला, राजकारणाची पत वाढवायला व गरिबांचे प्रश्न सोडवायला कोण नाही म्हणेल? दोन पोरांना अर्धी-अर्धी भाकरी वाटून, उपाशी पोटी झोपणारी माय सत्तेत येतेय तर पोटदुखी कशासाठी?

बाईने राजकारणात यावे म्हणून काय करावे? जशी घरात बाई दुय्यम तशी पक्ष महिला आघाडीही दुय्यम- हे कसे आणि कोण थोपवणार? महिला आघाडीही महिलांबाबतच्या निर्णयात तरी पक्षात असते का? पेरेंट कमिटी, तिकीट वाटप यंत्रणा व वित्तीय निर्णय यंत्रणा यात पक्षपातळीवर बाईचे स्थान काय? पक्षासाठी फंड जमवायची कला नसली तर तिने पक्ष निर्णयात येऊच नये का, यावर उपाय काय?

'सावित्री जिथे वसे; तिला जोतिबा दिसे,' या म्हणीनुसार प्रत्येक पत्नी सावित्री व पती जोतिबा होऊ लागले तर निम्मे प्रश्न संपतील. पुरुषांना जोतिबावारस व्हायची ही नामी संधी आहे. पुढची पिढी तरी जोतिबा वारसपुत्र होवो.



शिक्षीत व न्याय मागायला रस्त्यावर येणाऱ्या या दलित महिला संख्येने खूप आहेत. आजवर ती घरातच होती. तसेच मोर्चे व उत्सवांत ती मोठ्या प्रमाणावर भागीदारी करते. सत्तेत यायला तिला हे निम्मे आरक्षण ही चांगली संधी आहे. स्थानिक प्रश्नांवर महिला निवडणूकीत उभी राहते. त्यात बचतगटाचा वाटा सिंहिणीचा असतो. कार्यकर्ती व गर्दी जमवणारी ही वाघीण! ती सत्तेत यायला तिचा पदर डोक्यावरून खाली न ढळता, ती आली तर बरं! हा सरंजामी चाबूक अजूनही दिसत नसला तरी 'ए ऐकलं का' किंवा 'व्हय बाजूला, मी बघतो,' अशा सुरांत हा चाबूक सटासट आवाज काढतच असतो.

सत्तेचे नाव काढले की खुर्चीवर बुड टेकवून पुरुषांचे फर्मान जाते. 'मी सांगेन तसं करायचं, समजलं नाही तर गप्प बसून राहायचं- ज्ञान किंवा अज्ञान  काहीच दाखवायचं नाही. लोकांना मग वाटतंच बाई हुशार आहे! गपगार बसायचं, मी पाहून घेतो सारं!' सर्वांत जास्त बाहुल्या उच्च कुळांनी ठरवून घडवल्या. संस्था, संघटना व चळवळींनी महिलांना निवडणुकीला उभे केले. संघटनांनी निवडणुकीची पूर्वतयारी शिबिरे घेतली. कार्यकर्त्यांनी वॉर्डावार्डांत जाऊन कार्यशाळा घेतल्या. रेशनिंग कृती समितीच्या वतीने 'रेशन' हा निवडणुकीचा राजकीय मुद्दा बनवण्याचा जोरदार प्रयत्न केला.

थोडक्यात रणधुमाळीची तयारी व हा फुफाटा उधळायला सुरुवात झाली. दीड लाख महिला स्थानिक स्वराज्य संस्थेत फक्त गप्प बसून राहतील काय? किंवा त्या फक्त घरगुती गप्पा मारणार काय? नाही! त्यांना कायद्यानं आरक्षण मिळाले तसे समाजाचे शहाणपण व पक्षाचे संरक्षण मिळाले तर त्या पक्षांतील गोंधळाचा माहोल बदलायला नक्की धजावतील. राजकारणाची बदनामी थांबवायची तर महिलांची भागीदारी पुरुषांनी हिमतीने स्वीकारली पाहिजे. पक्षांनीही त्यांना निर्णयप्रक्रियेत घेतलेच पाहिजे. राजकारणातील महिलांची भागीदारी धारदार व्हायची तर, पक्ष तिकीट कमिट्यांमध्ये त्यांना घेतलेच पाहिजे. तसेच पक्के वॉर्ड, त्यांना देऊन जिकल्यानंतर त्यांच्या कारभारात मदतीच्या नावाखाली मालकी दाखवता कामा नये. घरात मालक असले तरी कारभारात व घरातली मालकी बंद झाली पाहिजे. त्यासाठी युवतींनीही राजकारणात यावे म्हणून राजकारणाची गोडी घरा-घरात वाढायला हवी. ''राजकारण म्हणजे गजकरण'' ही म्हण बदलून ''राजकारण म्हणजे भविष्याचे तारण'' हे पटले पाहिजे. घरा-घरांत राजकारणाबद्दल प्रेमभाव निर्माण झाल्याशिवाय हा देश ताळ्यावर येणार नाही. मग आपल्याच लायकीचे आपल्याला उमेदवार मिळतात, त्यात चूक काय?

गप्पांचे विषय जसे घरगुती असतात, तसेच तरुण पिढी व महिलांनी राजकीय विषयदेखील बोलले पाहिजेत. स्वतः एक तरी सत्ताकेंद्र ताब्यात घेऊन, गरिबांचा मुद्दा लावून धरणारी 'ती' सत्ताधारी बनायला पाहिजे. जे जे आपल्याला राजकारणात जमणार नाही असे वाटते; ते ते करून पाहिले पाहिजे. पहिल्यांदा घोड्यावर बसतांना, एखादी जखमी होईल; पडा-पडी होईल; परंतु सवय झाली की घोडा नक्की ताब्यात येईल. निवडणूकीत समाजाची व मतदारांची ही परीक्षाच असते. बाया-बापड्यांचा अनुभव असा आहे की ''पैसे घ्या-मत द्या'' ही पद्धत मतदाराच्या तोंडावर पाच वर्षांसाठी पट्टी मारून टाकते! एकदा मत विका व कायमचं तोंड बंद करा. बस्स!

''पैसा एकदा कमवा व पाच वर्ष अश्रू जमवा'' हे दुःख व प्रश्न झेलत राहा- हे आता चालणार नाही. महिलांनी विकासाचा विडा उचलला आहे. मतदारांनीही काय करायचे, पक्ष व संघटनांनी त्यांची ताकद कशी वाढवायची- हा खरा पैजेचा विडा आहे!

''राजकारण बदलाया; राजकारणात या'' ही एकलव्यी गर्जना कारभारणींनी केवळ आरक्षणाच्या माध्यमातून दिलेली नाही. तीही बॅ. नाथ पैंच्या पठडीतील खरी सत्ताधारी बनू इच्छिते. ते म्हणतात; ''खरा सत्ताधारी कोण? जनतेच्या पायात काटा रूतला तर, ज्याच्या डोळ्यात अश्रू येतात. तो खरा सत्ताधारी!'' आपली आई, बहीण, पत्नी - जर सावित्री होऊ शकते; तर पुरूषांनी ''मॅडम डोईवर व आम्ही भुईवर'' हा विचार झटकून टाकला पाहिजे. जोतिबांचा वारसा आपणही जपला पाहिजे!

खरे तर, जेवणातला कडीपत्ता तब्येतीला चांगलाच! तसा तो कामापुरता वापरून टाकून देण्यापेक्षा, त्याचाही सन्मान करावा. मंत्रालयात जर ब्युटी पार्लर सुरू झाले तर विधिमंडळातील सर्वांचे चेहरे बॅनरवर पहायला जनताही राजी होईल! पुरुषांनाही सुंदर दिसायचा अधिकार आहेच ना! समाज सुंदर करायचा तर स्त्री-पुरुष दोघेही मनानं सुंदर झाले पाहिजेत, ते सुंदर तर राजकारण, सुंदरच होणार!

**लेखक संपर्क : महिला राजसत्ता आंदोलन,**
**मो. ९८६९२५९१९४ ● ई-मेलः bhim.rscd@gmail.com**



# अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या

- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (**POCSO**) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## साद-प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com



# मुलांच्या विश्वात जा

**स्त्रीला आई म्हणून मुलाला समजून घेण्याचे निसर्गतः मिळालेले कौशल्य खूप चांगल्या पद्धतीने वापरणे गरजेचे आहे. या नैसर्गिक देणगीचा आस्वाद घेताना गरज असते ती फक्त मुलांना आपल्या पालकांच्या विश्वात न आणता आपण मुलांच्या विश्वात जाऊन त्यांना समजून घेण्याची.**


## विशालाक्षी चव्हाण


कुठल्या तरी एका कंपनीचे रेडीमेड इडलीचे पीठ, डोशांचे पीठ आणि बरेच काही हवाबंद पाकिटात विकण्याची जाहिरात टीव्हीवर चालू होती. त्यात त्या मॉडेल गृहिणीला सगळ्यांसाठी एकाच वेळी नाश्ता बनवायच्या प्रयत्नात अचानक दहा हात फुटतात आणि एकाचवेळी ती नवऱ्यासाठी डोसा बनवते, सासऱ्यांसाठी इडली बनवते, सासूसाठी उपमा तर मुलासाठी रवा असे विविध नाश्त्याचे पदार्थ ती एकाच वेळी बनवते आणि ते ही त्या दहा हातांनी. जाहिरात कंपन्यांच्या तल्लख विचार क्षमतेचं कौतुक करावे तितके थोडेच असते म्हणा; पण इतक नक्की सांगेन ती जाहिरात पाहिल्यानंतर माझ्या डोक्यात मात्र वेगळीच घंटा वाजू लागली. प्रत्येक स्त्रीला असे मल्टीटास्किंगमध्ये प्रावीण्य मिळवावेच लागते. एकाच वेळी नवऱ्याचे फर्मान पाळा, आदर्श सून म्हणून सासू-सासऱ्यांच्या शब्दांत राहा, इतर नातेवाईकांच्या कुरघोडीच्या स्पर्धेत स्वतःला वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करा. त्यात एखादी नोकरी करणारी स्त्री असेल तर मग झालेच. ऑफिसच्या कामाची रेलचेल आलीच की त्यात. या सगळ्यात मात्र महत्त्वाची जबाबदारी बाजूला राहते, ती म्हणजे मुलांसोबत आई म्हणून नात घट्ट करण्याची जबाबदारी, ते नाते अधिक फुलवण्याची जबाबदारी, मुलांना त्यांच्या स्वभावाप्रमाणे खुलवण्याची जबाबदारी, अगदी आवडती आणि महत्त्वाची जबाबदारी आजच्या दैनंदिन जगण्यात प्रत्येक स्त्री कुठेतरी विसरत चालली आहे.

पालकांचे संस्कार आणि त्यात सगळ्यात महत्त्वाची भूमिका असते ती, आईची हे सांगणारी एक सत्य घटना मला इथे नमूद करायला आवडेल. स्वामी विवेकानंदांना संपूर्ण जग ओळखते, त्यांच्या वडिलांचे नाव विश्वनाथबाबू आणि आई भुवनेश्वरीदेवी या दोघांनीही विवेकानंदांच्या मनावर बालवयापासूनच संस्कार रूजवले, त्यात विवेकानंदांच्या आईचा मोठा वाटा होता हे म्हणण्याचे कारण पुढील प्रसंग.

त्या काळात बग्गीतून प्रवास करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे, विश्वनाथबाबू दररोज अशाच त्यांच्या बग्गीतून कोर्टात जात. छोटा बिले (विवेकानंद) ते सारे कुतूहलाने पाही. त्याला बग्गी चालविणाऱ्या कोचवानाची ऐट, त्याचे घोडा हाकण्याचे कसब याची मौज वाटे. एके दिवशी घरात काम करत असताना अचानक विश्वनाथबाबूंनी बिलेला (विवेकानंदांना) विचारले, बाळ. तुला मोठेपणी काय व्हावेसे वाटते? बाजूलाच खेळत बसलेला निरागस बाळ बिले उद्गारला 'मला कोचवान व्हायचंय, कोचवान!' बिलेचे हे बोलणे त्याच्या आईने ऐकले. घरातील दिवाणखान्यात भिंतीवर महाभारतातील युद्धात श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथ्य करतोय हे भव्य तैलचित्र होते. ती त्या श्रीकृष्ण- अर्जुनाच्या भव्य तैलचित्राकडे गेली. तिने बिलेला बोलावलं, चित्राकडे बोट दाखवून ती बिलेला म्हणाली, 'बेटा बिले, तुला कोचवान व्हायचंय ना तर त्या श्रीकृष्णासारखा हो आणि साऱ्या जगाला मार्ग दाखव!' आणि त्यानंतरचा इतिहास तर आपल्या सगळ्यांना माहितच आहे,

**लवकर प्रकाशित**




सत्यघटनांवर आधारलेल्या या पुस्तकातील कथांमधून आपल्याला सध्याच्या समाजाचे वास्तवदर्शी चित्रण पाहायला मिळते. आजच्या आधुनिक जगात वावरतानाही महिलांना शारीरिक- मानसिक त्रासाला, आर्थिक फसवणुकीला कशाप्रकारे सामोरे जावे लागते, हे या कथांमधून समजते. मात्र, त्याचवेळी महिलांनी हातपाय गाळून न बसता स्वत:च्या गुणवैशिष्ट्यांप्रमाणे हर एक प्रसंगाला निडरतेने कसे सामोरे जायला हवे, हेदेखील या कथा सांगतात. राज्य महिला आयोगाचा आधार घेतल्यास कुठेही वाच्यता न होता कठीण प्रसंगातूनही कसा मार्ग काढता येतो, हे दाखविले जाते. महिला आयोग हे महिलांचे जणू हक्काचे माहेरच आहे. कुठल्याही प्रसंगात महिला आयोग साथ देईल, याची जाणीव हे पुस्तक करून देते.

किंमत - १०० रुपये

*(* विशेष सवलतही उपलब्ध.)*

त्यानंतर जीवनात विवेकानंदांनी भारत देशालाच नाही तर संपूर्ण जगाला मार्ग दाखवला. भारतीय संस्कृतीच अलौकिक दर्शन संपूर्ण जगाला घडवलं त्याची बीजे या अशा संस्कारात होती.

हे आणि अशी कितीतरी उदाहरण भारताच्या इतिहासाच्या प्रत्येक पानावर रेखाटलेली मिळतील. जिजाऊंच्या पालकत्वात घडलेले शिवाजी महाराज असो वा संस्कारक्षम आईच्या पदराखाली उमललेले साने गुरूजींसारखे कोमल आणि निर्मळ व्यक्तिमत्त्व असो. स्त्रीला मुलांवर संस्कार घडवण्याची खूप मोठी क्षमता निसर्गानेच बहाल केलेली असते. कारण मूल हे स्त्रीच्या शरीराचाच एक भाग असतो. प्रसूतीनंतर मातेच्या शरीरापासून बाळाला वेगळे करताना नाळ कापली जाते,पण त्याच क्षणी त्या मातेचे आणि बाळाचे हृदयाशी नाते घट्ट होते. कारण मातेने त्या बाळाच्या हृदयाचे ठोके आपल्या शरीरात अनुभवलेले असतात.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट या विषयाशी निगडीत आहे म्हणून इथे मांडते. माझ्या एका मैत्रिणीने तिची व्यथा माझ्यासमोर मांडली. तिचे असे म्हणणे होते की, तिचा मुलगा अर्णव कुठूनतरी शिव्या ऐकून आलाय आणि आता तो इतर मुलांसोबत खेळताना सर्रास शिव्या देतो. त्यांच्या घरात कोणीच अशा शिव्या देत नाही. मग या शिव्या त्याने कुठून ऐकल्या असतील? आणि आता किती ओरडले, मारले तरी घरात नाही पण खेळताना आपसूक अर्णवच्या तोंडून शिव्या निघतात, इतर मुलांचे पालक तक्रार घेऊन येतात, त्या पालकांसमोर मात्र हिची बाजू पांगळी पडते. अशा वेळी मुलाला ओरडण्याव्यतिरिक्त ती काहीच करू शकत नाही. नऊ दहा वर्षांच्या तिच्या त्या मुलाने कधीतरी शाळेच्या वॉचमनला शिव्या देताना ऐकले होते. त्यात रोज शाळेत सोडणारा व्हॅनवालादेखील फोनवर सर्रास शिव्याच देऊन बोलायचा. हे कानावर पडून पडून त्या मुलाने ती भाषा अवगत गेली होती, पण आता प्रश्न होता त्या मुलाला कसे समजावायचे?. शांतपणे समजावूनसुद्धा त्याच्या आपसूक तोंडातून निघणाऱ्या शिव्यांची सवय काही जात नव्हती. मग मला आठवले आई मुलाचे हृदयाचे नाते. तिला एक प्रयोग करायला सांगितला. रात्री अर्णव गाढ झोपल्यावर त्याच्या डोक्यावरून हळूवारपणे मायेने हात फिरवत त्याला समजावायला सांगितले. गोड शब्दांत तो कसा चांगला मुलगा आहे, आणि त्याच्या या सवयीमुळे सगळे कसे त्याला वाईट समजतील, असे सगळे समजावण्याच्या सुरात रात्रीच्या शांततेत मिसळून बोलायला सांगितले. सुरुवातीला तिला मी सांगितलेले सगळे मूर्खासारखे वाटत होते. तिचे असे म्हणणे होते की, तो गाढ झोपेत असताना माझे बोलणे कुठे ऐकू जाणार आहे त्याला? तिच्या कोणत्याही प्रश्नाचे निराकरण न करता, मी तिला सांगितले की, तुला रिझल्ट हवा असेल तर या क्षणी तुला माझ्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवावा लागेल आणि तो तू ठेवायलाच हवास. त्यानंतर मग तिने दोन आठवडे रोज रात्री अर्णव झोपल्यानंतर मी सांगितल्याप्रमाणे केले. उत्तम रिझल्ट तिच्यासमोर होता.



काही दिवसांतच अर्णवने शिव्या देणे बंद केले होते. याच कारण इतकेच होते की आपण निद्रावस्थेत असताना आपलं अंतर्मन म्हणजेच ज्याला आपण म्हणतो 'सबकॉन्शिअस माइंड' ते सतत जागृत असते आणि त्याचवेळी ते दुपटीने कार्यरत असते. अशा वेळी स्पर्शाचा एक बंध बनवित मुलांशी आईने संवाद साधल्यास मुले नकळतपणे त्याला प्रतिसाद देतात. बरेचदा खूप चांगल्या पद्धतीने समजावूनदेखील मुले ऐकत नाहीत कारण त्यांच्या या अंतर्मनापर्यंत ते समजावणे पोहोचलेलेच नसते; परंतु रात्री गाढ झोपल्यानंतर मायेच्या स्पर्शाच्या माध्यमातून मुलांशी संवाद साधल्यास मुलांमध्ये कमालीचा बदल दिसून येतो. ही नैसर्गिक देण मातृत्वातच दडलेली असते. हे कौशल्य आईकडेच असू शकते, कारण पुरुषाकडे आईच्या स्पर्शाइतकी कोमलता कधीच नसते आणि मुलांना ही कोमलताच जास्त जवळची वाटते.


हल्ली आई-वडील दोघेही नोकरीवर असतात, ती गरजच आहे सध्याची असेही म्हटले जाते. अशा वेळी सकाळी आठच्या ठोक्याला आई मुलाला बसमध्ये बसवून शाळेत पाठवते. त्यानंतर ती नोकरीवर जाते आणि मग सरळ रात्रीच आई मुलाची भेट होत असते. शाळा, क्लासच्या चक्रव्यूहात अडकवलेल्या मुलांना कुठला मिळणार आहे पालकांचा सहवास. यात कुठेतरी मुले आणि पालक या नात्यात पोकळी निर्माण होण्याची खूप मोठी शक्यता असते. मग ही पोकळी कशी भरून निघणार तर त्याचे खूप सहज आणि सुंदर उत्तर आहे, आणि ते म्हणजे मुलाशी हृदयाचे नाते निर्माण करणे. हे नात मुलाला समजून घेताना आपसूक निर्माण होत असते. मुलांच्या निरागस वागणुकीतून उलगद उमलवता येऊ शकते. गरज आहे ती आपल्यात असलेल्या या कौशल्याची जाणीव होण्याची. गरज असते ती व्हॉट्सअप, फेसबुकच्या 'बिझी शेड्यूल'मधून बाहेर येण्याची आणि आपल्या मुलांच्या वागणुकीला निरीक्षणातून समजून घेण्याची.

मग मार्ग सोपा होतो त्यांच्या प्रत्येक प्रश्नावर उत्तर मिळवण्याचा सुंदर प्रवास सुरू होतो मुलांमध्ये आणि आपल्यात एक पारदर्शी नाते खुलवण्याचा. मुलांना आपल्या सहवासात ठेवून त्यांना पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त ज्ञान देता आले तर मुलांना नक्कीच आनंद होतो. कारण पुस्तकी गोष्टींचा त्यांना कंटाळा आलेला असतो. अभ्यास या प्रकरणाचा त्यांच्या ब्लॅकलिस्टमध्ये समावेश झालेला असतो मग अशा वेळी मुलांच्या सहवासात राहून त्यांच्या आवडी समजून घेता येतात. आपली अपूर्ण राहिलेली कोणतीही इच्छा मुलांवर न लादता मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेऊ दिला आणि या प्रवासात आपण त्यांच्या सोबत राहिलो की आपोआपच हे हृदयाचे नाते घट्ट होते. खूप सोपे असते. फक्त गरज असते मुलांच्या भावविश्वात डोकावण्याची. स्त्रीला आई म्हणून मुलाला समजून घेण्याचे निसर्गतः मिळालेले हे कौशल्य खूप चांगल्या पद्धतीने वापरणे गरजेचे आहे. या नैसर्गिक देणगीचा आस्वाद घेताना गरज असते ती फक्त मुलांना आपल्या पालकांच्या विश्वात न आणता आपण मुलांच्या विश्वात जाऊन त्यांना समजून घेण्याची. तेव्हाच मग कुठे विचारांची नाळ घट्ट विणली जाईल आणि विचाराने आणि आचरणाने सुदृढ पिढी उदयास येईल.



# महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा वर्धापन दिन उत्साहात

# ‘साद’चे थाटात प्रकाशन




## महिला सक्षमीकरणासाठी आयोग कटिबद्ध - विजया रहाटकर

साद प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा रौप्य महोत्सवी वर्धापनदिन २५ जानेवारी २०१८ रोजी आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात पार पडला. ‘महिलांना घटनात्मक अधिकार मिळवून देणे तसेच त्यांच्या आर्थिक, सामाजिक सक्षमीकरणासाठी आयोग कटिबद्ध आहे,’ असे प्रतिपादन यावेळी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे माजी संघटन मंत्री रवी भुसारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाला एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत भांगे, आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर तसेच आयोगाच्या सदस्या नीता ठाकरे, देवयानी ठाकरे, गयाताई कराड, विंदा कीर्तीकर, ॲड. आशा लांडगे, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे व्यासपीठावर होते.

महाराष्ट्र राज्य महिला आयोजगाचे काम राज्यभर पोहोचावे तसेच महिलांच्या आर्थिक, सामाजिक सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाने सुरू करण्यात आलेल्या ‘साद’ मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील वरिष्ठ महिला पत्रकार रश्मी पुराणिक यांचा माध्यम क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या, ‘‘केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार महिलांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे. मुस्लिम महिलांचे घटनात्मक अधिकार त्यांना मिळवून देणे, ॲसिड हल्ला पीडिता तसेच अनाथ मुलांचे आयुष्य सुकर व्हावे यासाठी शासन सर्वतोपरी काम करत आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांना न्याय, आर्थिक तसेच सामाजिक बळकटी देणे यासाठी कार्यरत आहेच, भविष्यात महिलांविषयक कायद्याचे ज्ञान शेवटच्या स्तरातील महिलेपर्यंत पोहोचावे यासाठी आयोग काम करेल.’’

विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, विद्यार्थी आदी या वेळी उपस्थित होते.




**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा रौप्य महोत्सवी वर्धापनदिन २५ जानेवारी २०१८ रोजी आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमातील प्रसन्न क्षणचित्रे.**

---

वर्धापन दिनानिमित्त संदेश फलक लिहिताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



कार्यक्रमाची सुरुवातच आयोगाच्या सर्व सदस्य आणि निमंत्रितांच्या उत्साही स्वागताने झाली.




क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



दीपप्रज्वलन करताना एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी.




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रवीजी भुसारी यांना स्मृतिचिन्ह देताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत भांगे यांचे स्वागत करताना आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे.



आयोगातर्फे काढण्यात आलेल्या डायरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमाला उपस्थितांचा मिळालेला प्रतिसाद.




आयोगाचा कर्मचारीवर्गही या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाला होता.

# पोलिसांकडून मदत कशी मिळवावी...

- महिलांनी त्यांच्याविरुद्ध होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलीस ठाण्यास जावे.
- पोलीस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील.
- तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
- विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. पोलीस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलीस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
- तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासार्ह व्यक्ती हजर राहू शकतील. तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असाल तर पोलीस तुमची तक्रार नोंदवून घेतील. त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत जिल्हास्तरावरील महिला बाल विकास अधिकारी, या कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देतील.
- महिला जर लैंगिक गुन्ह्याच्या बळी असेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
- महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल तर पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद/जबाब नोंदवतील.
- महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक/मानसिक व्यंग असेल तर पोलीस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवून घेतील.
- महिला पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता पोलीस घेतील.



- पोलीस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
- जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील.
- महिला पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही.
- महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात.
- एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलीस व महिला साक्षीदार असतात.
- महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.
- विनयभंग, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांची ओळख ही गोपनीय ठेवण्यात येईल.

# हसऱ्या मुखवट्यामागचा खरा चेहरा

**विचित्र वागण्याने आपलं कुटुंब रस्त्यावर येवू शकते. बायको, मुलाबरोबरच आपलीही वाताहत होऊ शकते, हे त्याला त्याच्या भाषेत सम जावून सांगितल्यानतर त्याने आपण पुढे असे वागणार नाही हे लेखी लिहून दिले. हे सोडाच बायको, मुलाला जवळ घेत त्यांची मनापासून माफी मागितली.**

## धनंजय बिजले

‘तुला साधा स्वयंपाक नीट करता येत नाही!.., भाजीला किती तेल वापरतेस..., तुझ्या असल्या अति तेलवापरामुळे मी जाड झालोय...जरा चांगला स्वयंपाक तरी करायला शिक...दिवसभर मर मर काम करायचे, कामावरून दमून भागून याचचे आणि घरी आलो तर काय तुझा पडलेला चेहरा बघायचा...साधा हसरा चेहरासुद्धा ठेवता येत नाही तुला...’

अनेकांच्या घरात पती-पत्नीतले अशा स्वरूपाचे संवाद कानी पडतात. बहुतांश वेळी अनेक घरात पती आपल्या पत्नीला सतत टोमणे मारत असतो. यात नवरे महाशयांना फारच भूषणही वाटत असते. त्यांच्या मते आपण नोकरीला जातो, पैसे कमावून आणतो मग बायकोला बोलण्याचा आपल्याला जन्मसिद्ध अधिकारच आहे. त्यात जर बायको केवळ गृहिणी असेल तर मग काय बोलायलाच नको. नवऱ्याची जीभ जरा जास्तच सैल सुटते. अशावेळी त्या गृहिणीला सारं काही निमूटपणे ऐकण्याशिवाय, सहन करण्याशिवाय गत्यंतरच राहत नाही. आपल्या समाजात घरकामाला खरंच काही मोल नाही. कोणतीही गृहिणी खरं तर सकाळपासून रात्रीपर्यंत राब-राब राबत असते. वेळेचा जराही विचार तिच्या मनालाही कधी शिवत नाही. रात्री कितीही उशिरा झोपली तरी सकाळी सहाला उठायचं. मुलांचं आवरायचं, सकाळची शाळा असेल तर त्यांना टिफीन बनवून द्यायचा, शाळेत पाठवायचं. नंतर स्वतःचे आवरायचं. नाश्ता बनवायचा, नवऱ्याचा टिफीन बनवून द्यायचा. नवरा ऑफिसला गेला की पुन्हा घरची धुणी- भांडी करायची, कपडे धुवायचे, घर स्वच्छ आवरायचे. संध्याकाळी मुलांचा अभ्यास घ्यायचा. नवरोबा घरी आले की त्यांना काय हवे - नको ते पहायचे. यात ती बिचारी दमून जाते. पण तिला विचारतो कोण. कारण ती पैसे नाही ना मिळवून आणत. मग काय तिने कितीही राब राब राबले तरीही त्याचे मोल काहीच रहात नाही. कारण आपल्या समाजात सारे मोल पैशातच मोजले जाते ना...

अनेकांच्या घरात हे चित्र सहजपणे अनुभवायला मिळतेच. विक्रांत आणि सरिताचं घरही त्याला अपवाद नव्हतं. खरं तर सरिता चांगली शिकलेली. लग्नापूर्वी नोकरीही करायची, पण लग्न झालं, मोठ्या शहरात गेली. लग्नानंतर पहिल्याच वर्षी तिला छान मुलगा झाला. त्यामुळे नोकरी सुटली ती कायमचीच. विक्रांतदेखील हुशार. बॅंकेत नोकरीला. लग्न झाले त्यावेळी तो काही फार मोठ्या पदावर नव्हता, पण कामात तगडा. मन लावून काम करण्याची सवय. इतर सहकारी घड्याळाच्या काट्यावर काम करत असताना हा मात्र वेळेकडे कधीही पाहायचा नाही. प्रसंगी सहकाऱ्यांचीही कामे स्वतः अंगावर घेवून त्याचा निपटारा झाल्यावर घरी जाणारा. त्यामुळे कार्यालयात मनमिळावू स्वभावाचा असा शिक्का त्याच्यावर बसला होता. जो तो त्याचे कौतुक करत असे. त्यामुळे त्याला पटापट पदोन्नती मिळत गेली. आवश्यक असलेल्या परीक्षा उत्तीर्ण होत तो वरच्या पदाच्या शिड्या

पटापट चढला आणि आता तो बँकेत मोठ्या पदावर अधिकारी बनलेला. त्यामुळे साहजिकच सरिताने नोकरी केली नाही तरी त्याला चालणारच होते. उलटपक्षी त्याने सरिताला तो मुलाकडे, त्याच्या आईकडे म्हणजे सासूकडे लक्ष दे, घर सांभाळ असेच सुचवले. इकडे सरिताही घरात चांगली रमली होती. मुलगा हळूहळू मोठा होत होता. आता तो चांगला आठ वर्षांचा झालेला. इथपर्यंत तसं सारं कसं सुरळीत सुरू होतं. अधूनमधून विक्रांत चिडायचा, पण तेवढ्यापुरतंच. नंतर तो पुन्हा शांत व्हायचा. सासू-सुनेचं कधी कधी पटायचं नाही, पण भांड्याला भांडं लागलं की आवाज होणारच. त्यापेक्षा समोरच्या ओरडायला लागला आपण पडतं घ्यावं, शांत राहावं तेच घरासाठी हिताचं असं मानून सरिता शांत रहायची.. पण आता विक्रांतचा स्वभाव चांगलाच बदलत चालला होता. बँकेतही त्याच्या शब्दाला पदामुळे मान होता. त्याचा आदेश कोणी सहसा मोडत नसेच. पण तिथं आपली प्रतिमा जपण्यासाठी मात्र तो कोणावर खेकसत नसे. सर्वांशी हसतमुखाने बोलत असते. शिपायापासून ते सर्व सहकाऱ्यांसी तो हसत खेळत वागायचा. फोनवर सर्वांशी गोड बोलायचा. मात्र स्वारी घरात पाउल ठेवले की वेगळीच असायची. त्याचा सारा मूडच चेंज व्हायचा. घरात पाउल ठेवले की खेकसणे सुरू. त्यातच घरात पाउल ठेवले की आई सुनेविषयी तक्रारींचा पाढा वाचायची. आज आमटीत मीठ नव्हते इथंपासून ते दुपारी किती टीव्ही पाहते, फोनवर बोलते इथपर्यंत काहीही. मग विक्रांत जणू फुटायचाच. सरितावर प्रश्नांची सरबत्ती करायचा. तिला नावे ठेवताना तो थांबायचाच नाही.

बँकेत हसतमुख असणारा विक्रांत हाच का असा प्रश्न एखाद्याला पडला असता. दिवसभर तटवून ठेवलेला ताण तणाव, राग तो साराच्या सारा आपल्या बायकोवर काढायचा. त्यावेळी त्याचे स्वतःवरच नियंत्रण रहात नसे. हळूहळू दिवसेंदिवस त्याच्या शब्दांची धार वाढू लागली. आपली बायको इंजिनियर आहे, तिला स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे. ठरवले तर तीदेखील नोकरी करू शकते, आपल्यासारखेच पैसे मिळवू शकते, तिलाही तिचा म्हणून काही आत्मसन्मान आहे याचा त्याला कधीचाच विसर पडला होता. त्यामुळे तो घरात पाउल ठेवलं की सरितावर ओरडायला सुरुवात करायचा. हळूहळू शब्दांची जागा शिव्यांनी घेतली होती. सुरवातीला सहन करणारी सरिता आता त्याच्यापुढे हतबल होऊ लागली होती. वरचेवर विक्रांत चांगलाच आक्रमक होऊ लागला. नंतर थोड्या वेळाने शांत व्हायचा, पण तोपर्यंत सरिताची काही धडगत नसायची. बाबा असे का वागतात, हे लहानग्या मुलाला कळायचेच नाही. अर्थात ते त्याच्यावर ओरडायचे नाहीत, पण आईवर ते जेव्हा ओरडायचे त्यामुळे तो बिथरून जाई.

आज मात्र विक्रांतने कहरच केला. नेहमीप्रमाणे त्याच्या ओरडण्याला सरिता सरावली होती, पण आज तिचं डोकं खूप दुखत होतं. त्यामुळे तिने त्याच्या शिव्यांना प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विक्रांतने हद्दच केली. रोज बायकोला शिव्या घालणाऱ्या विक्रांतमधील पुरूष जागा झाला. त्याने सरिताच्या अंगावर हात उगारला. ओरडणे, शिव्या घालणे, हात उगारणे असा त्याचा प्रवास टप्याटप्याने पुढे सरकू लागला. आता तो ओरडण्यापेक्षा सरिताला मारहाणच करू लागला. अशा वेळी विक्रांतच्या आईची जबाबदारी मोठी होती. शेवटी एका बाईचं दुःख दुसऱ्या बाईशिवाय कोणी जाणू शकत नाही. मात्र तिच्यातली सासूबाईच जागी झाली. तिनं आपल्या मुलाचीच बाजू घेतली. विक्रांतला फार ताण असतो. तू काय घरात बसून मजा करतेस, पैसे कोण कमवून आणते. माझा मुलगाच ना. तो असा वागला तर कुठं बिघडलं असा तिचा युक्तिवाद. त्यामुळे विक्रातंच आणखी फावले. सरिता सारं निमूटपणं सहन करायची ते मुलाकडे पाहून.

पण वडिलांचा हा रुद्रावतार पाहून तो लहानगा पार घाबरून गेला. एके काळी बाबा घरी येण्याची वाट पाहणारा हा चिमुकला आता ते घरी येण्याची वेळ झाली की घाबरू लागला. 'बाबा आता घरी येणार तुला रागावणार, मारणार. चल आपण बाहेर जाऊ,' असं आईला म्हणू लागला. दिवसभर घरात बागडणारा हा छोकरा बाबांनी घरात पाऊल ठेवलं की बिथरू लागला. त्याच्या कोवळ्या मनावर भीतीची काळी छाया पसरू लागली. सरिता सारं काही सहन करायची ती मुलाकडे पाहूनच. आता मुलगा बाबांचं नाव काढताच घाबरू लागला. त्यांच्या जवळ जाण्याचं नावही घेईना म्हटलं की सरिता मनातून पार बिथरून गेली.

आता यावर काही तरी उपाय केलाच पाहिजे हे तिच्या मनाने ताडलं. झाले तेवढ पुरे झाले. आता जर सहन करत राहिलो तर सारं काही संपून जाईल या भीतीनं तिच्या मनात धस्स झालं. आता माहेरी जायचं पुढचं पुढे बघू, असं तिने मनाशी ठरवलं आणि ती तडक माहेरी गेली. माहेरी गेल्यावर तिला चैन पडत नव्हतंच. हे अंतिम साध्य नाही हे तिला माहिती होतंच. तिनं हातात पेन घेतला व आपल्या मनातल्या साऱ्या व्यथा कागदावर उतरवल्या. हे पत्र तिनं थेट महिला आयोगाकडे धाडलं. इकडं मुलगा व बायको माहेरी गेल्यानं विक्रांतची अवस्थाही बिकटच झाली होती. सुरुवातीला मला काय फरक पडतोय म्हणणारा विक्रांत घरी आला की अस्वस्थ होऊ लागला. कारण ओरडणार कुणावर. त्याच्या शिव्या ऐकणारं तरी कोणी पाहिजे ना...मधूनच त्याला वाटे बायकोला फोन करून बोलावून घ्यावं. लगेच त्याचा पुरुषी अहंकार जागा होऊन त्याला फोन लावण्यापासून परावृत्त करत असे. बायकोला शरण जाणे त्याच्या मते पराभव पत्करण्यासारखेच होते. एक दिवस अचानक त्याच्या हाती महिला आयोगाची थेट नोटीस पडली आणि तो हादरलाच. असं काही होईल, सरिता आपल्याविरुद्ध अशी काही तक्राला करेल, थेट आव्हान देईल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. एक दिवस ती माहेरून झक मारत घरी येईल जाऊन जाऊन कुठे, असंच त्याला त्याच्या आतला पुरुष सांगत होता. पण आता वेगळंच घडलं होतं. सुरवातीला त्याने या नोटिशीला दादच दिली नाही. नंतर मग थेट पोलिस चौकीतून विचारणा झाल्यावर मग त्याच्या डोळ्यापुढे काजवेच चमकले. हातातील सारी कामं बाजूला टाकून आईसह, त्याने महिला आयोगाचे कार्यालय गाठलं. सुनावणीसाठी आयोगाच्या कार्यालयात बायको, मुलगा पाहून तो थंडगार पडला. समुपदेशकांनी सरिताची तक्रार वाचून दाखवायला सुरुवात केली. मग मात्र त्याची बोबडीच वळली. बाहेर सर्वांशी हसतमुख, घरात शीघ्रकोपी असा त्याचा जणू दिनक्रमच झाला होता. थोडक्यात मुखवटा हसरा पण आतील चेहरा मात्र रागीट. यामुळे सरिताचे जीवन उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर होतं. त्या दोघांपेक्षाही मुलाचे सारे जीवनच पणाला लागले होते. सुरुवातीला साऱ्या कृत्यांना नकार देणारा विक्रांत नंतर मात्र एक एक गुन्हे कबूल करू लागला. कधी तरी बायकोला चुकून मारतो असे सांगून विक्रांतची बाजू सावरण्याचा प्रयत्न त्याच्या आईने केला. पण तुम्ही स्वतः महिला असून सुनेला मारत असताना तुम्ही गप्प कसे काय बसला या प्रश्नावर त्यादेखील निरुत्तर झाल्या. खरं तर त्याचं वागणे चुकीचंच होतं, पण कान पिळून त्याला तितक्याच आक्रमकपणे सांगणारे कोणी भेटले नव्हते. झाले तेवढ पुरेसे आहे, आता काही झाले तरी सहन करायचे नाही असा विचार सरिताने केल्यामुळे विक्रांतपुढे आपल्या चुका मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. माणसाला स्वतः ची चूक मनापासून पटली तर तो मग चार पावले मागे घेण्यास राजी होण्याची शक्यता असते. महिला आयोगामुळे विक्रांतच्या बाबतीचे हेच घडलं. आपल्या असल्या विचित्र वागण्याने आपलं कुटुंब रस्त्यावर येवू शकते. बायको, मुलाबरोबरच आपलीही वाताहत होऊ शकते, हे त्याला त्याच्या भाषेत सम जावून सांगितल्यानतर त्याने आपण पुढे असे वागणार नाही हे लेखी लिहून दिले. हे सोडाच बायको, मुलाला जवळ घेत त्यांची मनापासून माफी मागितली. त्यावेळी मात्र त्याच्यातील मूळचा विक्रांत जागा झाला होता. त्याच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वहात होत्या. साऱ्या कृत्यांच्या पश्चात्ताप त्याला होत होता. माझे डोळे उघडले, माझा संसार वाचवला याबाद्दल तो महिला आयोगालाच आता धन्यवाद देत होता.



# आम्हाला हवी लेकच

**स्त्रीचे अस्तित्वच नाकारणारा समाज आज स्त्रीच्या अस्तित्वाची गरज मान्य करू लागला आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ (छत्रक्रड) अंतर्गत नुकत्याच करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून ही बाब पुढे आली आहे. देशातील ८० टक्के लोकांना असे वाटते की, घरात एक तरी मुलगी असायला हवीच. हा एक चांगला संकेत आहे.**




## प्राची एक्के


समाजात वावरताना नेहमी समता गृहीत धरलेली असते. समतेशिवाय समाज उभाच राहू शकणार नाही. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे प्रमुख घटक आहेत, म्हणून त्यांच्यात समता अपेक्षिणे रास्तच आहे. स्त्री आणि पुरुष दोघेही नात्यांनी तुल्यबळ आहेत, पण स्त्रीचे अस्तित्व कायमच धोक्यात आले आहे. तिचे असणेच अनेकदा समाज नाकारतो, परंतु ठाम आणि निश्चित अशी भूमिका घेणाऱ्या आजच्या स्त्रीचे महत्व आता समाजाला पटू लागले आहे.

स्त्रीवर्गाला समाजाकडून आजही संपूर्णपणे न्याय्य वागणूक दिली जात नाही, परंतु हे मान्य करूनसुद्धा एक निश्चित सांगता येईल की, आजच्या समाजाची मानसिकता मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. बदलत आहे. आजची स्त्री ही बऱ्यापैकी सामाजिक प्रतिष्ठेच्या स्थानावर येऊन ठेपली आहे.

सामाजिक बदलाची एक गती असते. त्या गतीनुसार ते बदल घडत असतात. स्त्री-पुरुष नात्यातही हे बदल घडताना दिसत आहेत. स्त्रीचे अस्तित्वच नाकारणारा समाज आज स्त्रीच्या अस्तित्वाची गरज मान्य करू लागला आहे. याचे मुख्य उदाहरण म्हणजे, नॅशनल फॅमिली हेल्थ (NFHS) अंतर्गत नुकतेच करण्यात आलेले एक सर्वेक्षण. या सर्वेक्षणांतर्गत ही बाब प्रकर्षाने समोर आली की, देशातील ८० टक्के लोकांना असे वाटते की, घरात एक तरी मुलगी असायला हवीच. हा नक्कीच एक चांगला संकेत मानला जाऊ शकतो.

'टाइम्स ऑफ इंडिया'ने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, या सर्वेमध्ये समाविष्ट झालेल्या १५ ते ४९ वयोगटातील ७९ टक्के महिला आणि १५ ते ५४ वयोगटातील ७८ टक्के पुरुष हे मान्य करतात की घरात कमीत कमी एक तरी मुलगी असायलाच हवी. अनुसूचित जाती जमाती, मुस्लीम आणि ग्रामीण भागातील तसेच आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गटामध्येही मुलीचे

अस्तित्व स्वीकारणाऱ्याची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. उलट शहरी आणि शिक्षित लोकांपेक्षा ग्रामीण आणि अशिक्षित लोकांमध्ये 'मुलगी हवीच'हे मान्य करणाऱ्याची संख्या जास्त प्रमाणात वाढत आहे. २००५-०६ च्या सर्वेक्षणानुसार, ७४ टक्के महिला आणि ६५ टक्के पुरुष 'मुलगी हवी'या मताचे होते तर यंदा नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार समोर आलेली आकडेवारी पुढीलप्रमाणे - (टक्क्यांत)

| | ग्रामीण | शहरी | शिक्षित | अशिक्षित |
|---|---|---|---|---|
| महिला | ८१ | ७५ | ७२ | ८५ |
| पुरुष | ८० | ७५ | ७४ | ८३ |

हा आलेख अशा प्रकारे का बदलत गेला? मुळात हा आलेख खालावलाच का? सर्वेक्षण का करावे लागते? स्त्री-पुरुष जन्मदरामध्ये तफावत का? समानता का नाही? याचे मूळ कुठे? आणि मग यावर काय उपाययोजना केल्या की ज्यामुळे हा आलेख आता समानतेच्या पातळीपर्यंत येत आहे आणि तो १०० टक्क्यांपर्यंत यावा यासाठी अजून काय करायला हवे, या सर्वच बाबींचा या निमित्ताने विचार व्हायलाच हवा.

आपल्या देशातील ० ते ६ वर्ष वयोगटातील बालिकांमधील प्रत्येक हजार मुलांमागे असलेल्या मुलींच्या जन्मदराचे म्हणजेच बाल लिंग गुणोत्तर प्रमाण १९९१ ते २०११ या कालावधीपर्यंत दिवसेंदिवस कमीच होताना दिसत होते. १९९१ च्या सर्वेक्षणानुसार ही आकडेवारी ९४५, २००१ साली ९२७ आणि २०११ साली ९१८ अशी होती; पण याची सुरुवात खूप आधीच झाली होती. भारताच्या जनगणनेची आकडेवारी १९०१ पासून उपलब्ध आहे. या आकडेवारीवर नजर टाकल्यास एक बोचणारी गोष्ट लक्षात येते. गेल्या शंभरहून अधिक वर्षांत कधीही स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त नव्हती. असे का? मुलांच्या तुलनेने मुली जन्मतातच कमी अशी वस्तुस्थिती नाही. मुली मुलांपेक्षा दुर्बल असल्याने बालमृत्यूत त्यांचे प्रमाण जास्त असते, असेही वैद्यकशास्त्राचे मत नाही, असे बारकाईने अभ्यास केला असता लक्षात आले. असे असतानाही स्त्रियांची संख्या कमी का? पोषणात मुलींना मिळणारे प्राधान्य कमी की त्यांची घेतली जाणारी काळजी कमी. काहीतरी असलेच पाहिजे. विकसनशील देशांच्या अभ्यासात या हरवलेल्या मुलींची खूपच चर्चा झाली आणि लक्षात आले की, बालकांतील लैंगिक गुणोत्तर (CSR) असे दर्शवतो की, बाळाच्या जन्मापूर्वी लिंगपरीक्षण करून घेण्याचा निर्णय हे या समस्येचे मूळ आहे. गर्भजलपरीक्षण, भ्रूणहत्या आणि ती फक्त स्त्री गर्भाची याने निसर्गाचे संतुलन बिघडेल, भावी काळ उलटा येईल हे त्यावेळी समाजाच्या लक्षातच येत नव्हते.



मुलगी म्हणजे खर्चाची बाब. तिच्यावर केलेला खर्च बुडीत असतो. तिचे संगोपन, खाणे-पिणे, कपडे, शिक्षण हे सारे त्या घराण्याला उपयोगी नसते. मुलगी परक्याचे धन. खर्च करून मोठी करायची आणि पुन्हा खर्च करून लग्न करून द्यायचे. न कमावणारे एक मूल पोसून, वाढवून परक्यास देणे हे हिशेबाने तोट्याचेच. शिवाय तिच्या संरक्षणाची जबाबदारी वेगळीच. असा विचार करताना भावनिक आणि वात्सल्याचा भाग पूर्वीच्या काळी दुर्लक्षितच होता. या उलट मुलगा ही फायद्याची बाब. तो मोठा झाल्यावर पैसे कमावतो. म्हातारपणी वडीलधाऱ्यांचा आधार होतो, याच विचाराच्या पगड्याखाली आजपर्यंत समाज खितपत पडला होता. मुलगी ही बोजा म्हणून वाढवतात आणि मुलगा हा भावी पोशिंदा आणि कुलदीपक समजून त्याचे संगोपन केले जाते. या भेदामुळेच आज विसाव्या शतकापर्यंतही लोक 'मुलगी नको'याच मताचे होते.

आज मात्र परिस्थिती बदलत आहे. बदलाची ही गती कदाचित संथ असेल पण निश्चित मार्ग देणारी आहे. आपल्या देशातील स्त्रीविषयक सुधारणांची सुरुवात स्त्री शिक्षणाने झाली. त्यामुळे ही स्त्री संघर्ष करीत नाही, सामंजस्य दाखवते, स्वत:ला सिद्ध करते. अशाच स्त्रियांनी समविचारी पुरुषांच्या सहकार्याने परंपरानिष्ठ समाजाला हे दाखवून दिले की, त्याही यश मिळवू शकतात. स्त्रीमुक्तीच्या चळवळीने जी भूमिका घेतली त्यामुळेच स्त्री सुधारणेची मजल येथपर्यंत गाठता आली. आज अनेक शिक्षण संस्थांमध्ये मुलांपेक्षाही अधिक संख्येने मुली शिक्षण घेताना आढळतात. स्त्री शिक्षणाच्या प्रवाहाची आज नदी झाली आहे. आजची सुशिक्षित महिला आपल्या कर्तबगारीने समाजात मान-सन्मानाचे जीवन जगू लागली हा प्रबोधन करणाऱ्या पुरुषांचा आणि सामाजिक क्रांती घडवून आणणाऱ्या महिलांनी केलेल्या सुधारणांचा विजय आहे. आता एक ते दोन मुले पुरेत त्यातही मुलगाच हवा असे नाही, अगदी एक मुलगीही चालेल. जे भलेबुरे व्हायचे असेल ते टळत नाही असा सद्सद्विवेकबुद्धीने करायचा विचार होताना दिसत आहे.

या सर्व प्रक्रियेमध्ये सरकारने आपली भूमिका चोख बजावली आहे हे विसरून चालणार नाही. मुलींना कमी लेखणारी, मुलींच्या विरुद्ध असलेली समाजरचना, सहज उपलब्ध होणारी गर्भलिंगपरीक्षणाची सोय, यामुळे स्त्रीभ्रूणहत्येत होणारी वाढ आणि दिवसेंदिवस विषम होत जाणारे बाल लैंगिक गुणोत्तर ओळखून या समस्येवर एकत्रिपणे काम करून एकमेकांशी सहकार्य करण्याची आवश्यकता जाणून घेऊन सरकारने मुलगी वाचवा मुलगी शिकवा (बेटी बचाव बेटी पढाव अर्थात, बीबीबीपी) ही योजना सुरू केली. मुलींच्या कमी होत जाणाऱ्या जन्मदराच्या समस्येस तोंड देण्यासाठी बीबीबीपी ही योजना २०१४ च्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरू करण्यात आली. त्यामुळे आता ही देशव्यापी चळवळ बनली आहे. कमी होत जाणाऱ्या मुलींच्या जन्मदरानुसार बाल लैंगिक गुणोत्तर प्रमाणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी संपूर्ण देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील मिळून १०० जिल्हे निवडण्यात आले आहेत. महिला व बालविकास मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय (MWCD, MHFW, MHRD) या तिन्ही मंत्रालयांनी एकत्र येऊन ही बीबीबीपी योजना राबविण्याचे ठरविले आणि त्याचे योग्य ते परिणाम समोर येत आहेत. सरकारने उचललेले हे पाऊल निश्चितच महत्त्वाचे होते. तसेच टीव्ही, सोशल मीडिया

यांचाही यात महत्त्वाचा वाटा आहे.

यू ट्युबवर मुली वाचवा, मुली शिकवा या अभियानासंबंधीच्या व मुलींच्या कमी जन्मदराच्या समस्येच्या निराकरण करण्याविषयीच्या चित्रफिती उपलब्ध आहेत. सतत नवनवीन चित्रफितींची त्यात भर पडते. त्यामुळे या समस्यांविषयी जाणीवजागृती समाजात निर्माण केली जाते. तसेच फेसबुक, वॉटस् अप या सारख्या तत्सम माध्यमाद्वारेही मुलींचे महत्त्व पटवण्यात येते. ‘मुलगा मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको’ ‘मुलगा मुलगी एक समान, दोघही होतील देशाची शान’ यासारखी घोषवाक्ये तयार करून त्यांचा योग्य प्रचार करून भावनिकदृष्ट्या समाजामध्ये जागृती घडवली जात आहे

या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजेच आताचा नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वेचा सकरात्मक निकाल आहे असे म्हणता येईल; पण प्रश्न इथे संपत नाहीत. हा निकाल १०० टक्क्यापर्यंत कसा जाईल आणि बरोबरीला कसा येईल याचाही विचार व्हायला हवा.

स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व अर्थपूर्ण व्हावयाचे असेल तर मूल्यव्यवस्थेत बदल करून पुरुष आणि स्त्री यांना समान लेखणारी मूल्यव्यवस्था अस्तित्वात आली पाहिजे. स्त्रीला कुटुंबात बरोबरीचा दर्जा हा केवळ पुरुषांच्या मनाच्या मोठेपणावर अवलंबून असता कामा नये. तिचे शिक्षण आणि अर्थोत्पादनातील तिचा सहभाग या दोन गोष्टींनी तिचा दर्जा आणि तिचा व्यक्तीविकास निश्चित व्हायला हवा. यामुळे कुटुंबाचा दर्जाही वाढेल आणि तिची निर्णयशक्तीही वाढेल. आपले कुटुंब केवढे असावे या प्रश्नापासून ते निवडणुकीत मत कोणाला द्यावे या प्रश्नापर्यंत स्वत:चा निर्णय घेण्याची क्षमता तिच्या ठिकाणी निर्माण झालीच पाहिजे.

आता तिच्या बाबतीत नकारात्मक भूमिका सोडून सकारात्मक भूमिकेचा स्वीकार करायला हवा. स्त्री समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक करायला हवा यासाठी आवश्यकता आहे ती समाजातील स्त्री जीवनाची सकारात्मक बाजू समोर आणण्याची. ही सकारात्मक चित्रे पुन्हा पुन्हा चितारण्याची. निराशा, दु:ख, दैन्य हे आहेच पण त्यासोबतच दुर्दम्य आशावाद, प्रखर इच्छाशक्ती आणि प्रबळ आत्मविश्वास यांची उणीव नाही ही पटवून देण्याची. शिक्षणाच्या प्रसारामुळे, ज्ञान संपादनामुळे व्यक्तीमत्त्वच कसे मंतरून जाते हे पटवून देण्याची!. आई, सून, गृहिणी, पत्नी, सखी अशा कितीतरी कौटुंबिक भूमिका एकाचवेळी पार पाडत असताना देखिल नोकरदार महिला, व्यापारी प्रतिनिधी अशा विविध स्वरुपांच्या व्यावसायिक जबाबदाऱ्याही स्त्री हसतमुखाने पार पाडते हे प्रकर्षाने जाणवून देण्याची!

कारण मुळात प्रश्न हा समाजाच्या स्त्रीबद्दलच्या धारणेचा आहे. संपूर्ण आयुष्य पतीसाठी, मुलांसाठी आणि कुटुंबासाठी समर्पित करणारी स्त्री ही सखी, सहचारी आहे आणि सर्वात पलिकडे जाऊन ती संवेदनशील व्यक्ती आहे, याचे भान कुटुंबात, समाजात ठेवले जाईल तो सुदिन!

**या संदर्भात डॉ. सुधा कांकरिया**
**यांनी खूप छान म्हटले आहे,**

*ऐलमा पैलमा गणेश देवा करीत तुझी सेवा*
*जगव रे चिमुकलीला वाचव रे मुलीला*
*आजची चिमुकली उद्याची आई आहे*
*आईमुळेच मानवाची निर्मिती होत आहे*
*नसेल आई तर मानव नाही, वंश नाही*
*माणुसकी नाही, वात्सल्य नाही*
*माया नाही ममता नाही*
*काहीच मग उरणार नाही*
*जग होईल रितं पोरकं*
*मुलीच्या जन्माच स्वागत करणं*
*हेच खरं शहाणपणाचं ठरतं.*



# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५

**हा कायदा हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करतो.तसेच पुरुषांच्या विरोधात नसून मानवतावाद, कायदा, नैतिकता आणि न्याय यांच्याशी विसंगत वर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात आहे. या कायद्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आहे.**

| कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? | |
|---|---|
| शारीरिक छळ | मारणे, चावणे, लाथाडणे, ठोसे मारणे, ढकलणे, शारीरिक अत्याचार इत्यादी. |
| शाब्दिक किंवा भावनिक छळ | अपमानास्पद उपहासात्मक बोलणे, नावे ठेवणे, नोकरीस प्रतिबंध इत्यादी. |
| आर्थिक छळ | घरगुती गरजांसाठी पैसे, भाडे, हातखर्च इत्यादी न देणे, पगार, उत्पन्न जबरदस्तीने घेणे इत्यादी. |
| लैंगिक छळ | जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील चित्रफीत दाखवणे, बाल लैंगिक शोषण करणे इत्यादी. |
| **कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत स्त्रियांना मिळणारे आदेश** | |
| कलम १४ | अन्वये संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतगर्त उपलब्ध आहेत. |
| कलम १८ | अन्वये संरक्षण आदेश कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे. |
| कलम १९ | अन्वये निवासाचा आदेश स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरात राहण्यास अडथळा आणणे. |
| कलम २० | अन्वये पोटगीचा आथिर्क आदेश राहणीमानाच्या दृष्टीने पुरेशी उचित, योग्य व वाजवी आथिर्क लाभाची रक्कम. |
| कलम २१ | मुलांच्या ताब्याचा आदेश. |
| कलम २२ | अन्वये नुकसान भरपाई आदेश. व्यथित व्यक्तीला झालेली ईजा,मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई. |



# उद्याच्या आशा : पृथा, सालसा

**टेबल टेनिसपटू पृथा वर्टीकर आणि टेनिसपटू सालसा आहेर या खेळाडूंनी कॅडेट, सबज्युनिअर, ज्युनिअर स्तरावरील आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख सतत उंचावत ठेवला आहे. भविष्यात त्यांच्याकडे महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचे आशास्थान म्हणून पाहावे इतकी त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे.**


## अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com


भारतात क्रिकेट, टेनिस आणि बॅडमिंटन पाठोपाठ कोणता खेळ लोकप्रिय असेल तर तो आहे टेबल टेनिस. या खेळात भारताने अनेक रथी-महारथी खेळाडू पाहिले. आपण जरी अद्याप या खेळात ऑलिंपिक पदक मिळवू शकलो नसलो तरी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक खेळाडूंनी या खेळांत आपला ठसा उमटवला आहे. अशाच खेळाडूंच्या यादीत आणखी दोन नावे आता दाखल झाली आहेत. टेबल टेनिसपटू पृथा वर्टीकर आणि टेनिसपटू सालसा आहेर या खेळाडूंनी कॅडेट, सबज्युनिअर, ज्युनिअर स्तरावरील आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख सतत उंचावत ठेवला आहे. भविष्यात त्यांच्याकडे महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचे आशास्थान म्हणून पाहावे इतकी त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे.

भारतात माध्यमांचा सुळसुळाट झालेला नव्हता त्या काळात मुख्यत्वे कमलेश मेहता, चेतन बबूर आणि पौलामी घटक यांनी या खेळाला लोकप्रियता मिळवून दिली. आज कोणत्याही खेळाडूने जरा सरस कामगिरी केली तरी वृत्तपत्रात रकानेच्या रकाने बातमी छापून येते शिवाय इलेक्ट्रॉनिक मिडीया आहेच चोवीस तास बबलगम चघळायला. ही चंगळ तेव्हा नव्हती तरीही मेहता किंवा पौलामीने या खेळातही भारताचा दबदबा आहे हे सिध्द होते. कमलेश मेहता यांना आता या खेळाचे राष्ट्रीय सल्लागार व निरीक्षक म्हणून नियुक्त केले आहे. त्यांना या खेळातील योगदानाबद्दल शिवछत्रपती आणि अर्जुन या मानाच्या पुरस्कारांनीही गौरवण्यात आहले. आठ वेळाचे राष्ट्रीय विजेते म्हणून त्यांचा विक्रम आजही अबाधित आहे. मेहता हे राष्ट्रीय प्रशिक्षक म्हणूनही काही काळ कार्यरत होते. त्यांच्याकडून प्रेरणा घेत अचंता शरथ कमाल, सौम्यजीत घोष सारखे खेळाडू आज आपला ठसा उमटवत आहेत.

महिलांमध्ये हा खेळ लोकप्रिय करण्याचे श्रेय खरेतर पौलामी घटक हिच्याकडेच जाते. पाच वेळची ज्युनिअर राष्ट्रीय विजेती आणि पाच वेळची वरिष्ठ राष्ट्रीय विजेती बनताना वयाच्या केवळ सोळाव्या वर्षीच तिने सिडनी ऑलिंपिकमध्ये सहभाग घेतला होता. तीन वेळा तिने राष्ट्रीय विजेती बनण्याचाही मान मिळवला. पौलमी आज प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहे आणि नवनवीन खेळाडूंना मार्गदर्शन करत आहे. याच खेळाडूंकडून प्रेरणा घेत पुण्याच्या पृथा वर्टीकरनेही राष्ट्रीय आणि पाठोपाठ आंतरराष्ट्रीय पातळीवर ठसा उमटवला तर ती अभिमानाची बाब ठरेल, याच दिशेने तिची आज वाटचाल सुरू आहे.

पृथाकडे अफाट गुणवत्ता आहे असा विश्वास तिचे प्रशिक्षक रोहित चौधरी यांनी व्यक्त केला आहे



पृथा वर्टीकर

मात्र त्याचवेळी तिने शारीरिक तंदुरूस्तीबाबत कमालीचे गंभीर असायला हवे असेही नमूद केले. म्हणजेच आता कॅडेट गटात पृथाला तिच्या जास्त उंचीचा लाभ होत आहे, पण हाच लाभ सबज्युनिअर, ज्युनिअर गटात होईलच असे नाही. आता कॅडेट गटात उंचीमुळे संपूर्ण टेबल तिला कव्हर करता येते. मात्र पुढील वयोगटात उंचीबरोबरच शारीरिक तंदुरुस्तीही टिकवावी लागेल कारण तिथे तिला अशाच प्रकारच्या खेळाडूंचा सामना करायचा आहे. बारा वर्षांखालील गटात ती तिसरी मानांकित खेळाडू आहे हेच सातत्य टिकवले तर भारताला एक नैपुण्यवान खेळाडू निश्चितच मिळेल. तिने वयाच्या अकराव्या वर्षी महिला वयोगटात विजेतेपद पटाकवले होते, अशी कामगिरी करणारी पुण्याची ती पहिलीच खेळाडू ठरली होती. एकवीस वर्षांच्या खेळाडूवर मात करत तिने हे विजेतेपद मिळवले हीच सर्वांत अभिमानाची बाब आहे. इतकी गुणवत्ता या वयात खूप कमी खेळाडूंमध्ये दिसते. सन्मित्र संघात सराव करताना आज पाचवीत मॉर्डर्न हायस्कूलमध्ये शिकणारी पृथा एकदिवस देशाचेही प्रतिनिधित्व करेल असा विश्वास वाटतो.

पृथाला घरातूनच खेळासाठी पाठिंबा मिळाला ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. कित्येक खेळाडूंचा खेळ हा घरातच कोंढला जातो आणि मसो कॉल्डम अभ्यासी जगाची आभासी प्रतिमा उभी केली जाते. असे आपल्या देशात लाखो खेळाडू तयार होण्यापूर्वीच दाबले गेले आहेत. पृथा त्याबाबत नशीबवान ठरली. तिच्या आई स्वतः राष्ट्रीय स्तरावर कबड्डी खेळल्या आहेत, तर वडील तायक्वोंदो बरोबरच क्रिकेटमध्येही यश मिळवायचे. पृथा खरेतर तिच्या मोठया बहिणीकडून प्रेरणा घेत टेबल-टेनिस खेळायला लागली. मोठया बहिणीने हा खेळ खेळणे सोडून दिले, पण वारसा पृथाकडे सोपवला.

वयाच्या पाचव्या वर्षी सिंबायोसिसमध्ये पृथाने मधुकर सरांकडे टेबल-टेनिसचे धडे गिरवायला सुरुवात केली तेव्हाच त्यांना तिच्यातील गुणवत्तेची जाणीव झाली. ली मेरीडियन प्लेअर्स करंडक स्पर्धेतून नावारूपाला आलेल्या असंख्य खेळाडूंपैकीच पृथा एक. मात्र ते असंख्य खेळाडू आज कुठे आहेत आणि पृथाने किती झेप घेतली हे अभिमानास्पदच आहे. प्रत्येक सामना, प्रत्येक स्पर्धा गांभीर्याने खेळण्याचा तिचा गुणच तिला इतर खेळाडूंपेक्षा सरस ठरवतो. सध्या ती सन्मित्र संघात रोहित चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. आता तर काय तिचा समावेश भारतीय संघातही झाला आहे. आता तिच्यासाठी केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतराष्ट्रीय स्पर्धांची कवाडे खुली होणार आहेत.

नैसर्गिक गुणवत्ता, घरचा पाठिंबा, सातत्याने व वेळेच्या आधी मिळणारे यश यामुळे कित्येकदा खेळाडू जमिनीच्या वर चालायला लागतात. यश त्यांच्या डोक्यात जाते असे पृथाच्या बाबत होऊ नये यासाठी तिचे प्रशिक्षक व आई-वडील यांनाच सावध रहावे लागणार आहे जेणेकरून तिचे पाय जमिनीवर घट्ट राहतील आणि देशाला विनम्र पण सर्वोत्तम खेळाडू मिळेल. बघू या आता पृथा तिच्या कारकीर्दीचा आलेख कसा उंचावते ते.

## टेनिसमधील नवे आशास्थान !

एक सानिया मिर्झा यशस्वी होते आणि तिच्याकडून प्रेरणा घेत देशातील कित्येक मुली टेनिसमध्ये कारकीर्द घडविण्यासाठी सज्ज होतात. पुण्याची मानांकित खेळाडू सालसा आहेर ही देखील त्यापैकीच एक. मात्र तिच्या कामगिरीवर नजर टाकली तर हे रसायन काहीसे निराळेच वाटते आणि येत्या काही वर्षात भारताचे टेनिसमधील नवे आशास्थान म्हणून सालसा नावारूपाला आलली बघायला मिळेल.

वयाच्या सहाव्या वर्षीच रोहिणी लोखंडे यांच्याकडे ती टेनिसचे प्राथमिक धडे गिरवू लागली. सुरुवातीला तयार झालेली ही हौशी खेळाडू या खेळात खरोखरच गंभीर आहे हे जाणवल्याने तिच्या पालकांनी पुण्याच्या टेनिसचे माहेरघर असलेल्या डेक्कन जिमखाना क्लबमध्ये राष्ट्रीय विजेता खेळाडू व प्रशिक्षक संदीप कीर्तने यांच्याकडे तिला नेले. तिथे सालसावर व्यावसायिक टेनिसचे पैलू पाडायला सुरुवात झाली. सध्या ती डेक्कनवरच केदार शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.



सालसा आहेर

सिम्बायोसिस शाळेत दहाव्या इयत्तेत शिकणारी सालसा गतवर्षी फेड स्पर्धेतील निवडीमुळे परीक्षा देवू शकली नाही. यंदा मात्र दहावीची परीक्षेसाठी ती तयारी करत आहे.

कारकीर्दीचा सुरूवातीलाच पहिलीच स्पर्धा ती कोल्हापुरमध्ये खेळली आणि अभिमानास्पद कामगिरी करत तिने ही स्पर्धा जिंकलीदेखील. यानंतर तिने वळून पाहिलेच नाही आणि ज्युनिअर गटात यशाची कित्येक शिखरे पादाक्रांत करत आहे. पुरुषांचा जसा डेव्हिस करंडक असतो त्याच धर्तीवर महिलांसाठी फेड कप स्पर्धा असते. यंदाच्या मार्च महिन्यात ही स्पर्धा झाली मात्र सालसाला दोन सामन्यात विजय मिळाला तर दोन सामने गमवावे लागले. तिला झालेली दुखापत भारताला महागात पडली. देशाचा या स्पर्धेत बारावा क्रमांक आला. आता तिचे जागतिक क्रमवारीतील स्थान ३०४वे आहे. भारतीय क्रमवारीत ती दुसऱ्या क्रमांकावर होती आता सहाव्या क्रमांकावर आहे. अर्थात याचे कारण तिची कामगिरी खालावली नसून, तिने भारतातील स्पर्धा खेळणे कमी केले आहे तर 'एआयटीए' व 'डब्ल्यूटीए' स्पर्धांवर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. ती सध्या परदेशात देखील आठ ते दहा स्पर्धा खेळते. 'एशियन बी वन' स्पर्धेत पात्रता फेरीत एक सामना गमावूनही ती लॉटरी पध्दतीतून पुन्हा एकदा स्पर्धेसाठी पात्र ठरली. सिंगापूरमधील स्पर्धेतही सोळा वर्षांखालील स्पर्धेत उपांत्य फेरीपर्यंत गेली. तिची अशीच घोडदौड तिला उज्वल भवितव्य घडवायला मदत करेल.

ऑक्टोबर २०१५ साली चौदा वर्षांखालील गटात एकेरी आणि दुहेरीत तिला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले होते. मात्र ही कसर तीने पुढच्याच वर्षी भरून काढताना सोळा वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धा जिंकली. यंदा सालसाने एकेरीची दोन तर दुहेरीचे एक विजेतेपद मिळवले आहे. यंदाची कामगिरी पाहता ती येत्या काळात ज्युनिअर ग्रॅन्ड स्लॅम नक्कीच खेळेल असा विश्वास वाटतो. यंदाच्या वर्षी तिने एकेरीची १९, दुहेरीची दहा विजेतेपद मिळवली आहेत. आजवरच्या कारकीर्दीत तिने एकेरीची सत्तावीस तर दुहेरीची अठरा विजेतेपद प्राप्त केली आहेत.

लक्ष्य या संस्थेची मदत सालसाला मिळते शिवाय महाराष्ट्र लॉन टेनिस संघटनादेखील सर्वतोपरी मदत करते. संघटनेचे सचिव सुंदर अय्यर यांच्या सहकार्याने सालसाचा समावेश संघटनेची व्हीजन प्लेअर म्हणून झालेला असल्याने तिच्या स्पर्धांसाठी संघटना पूर्ण तयारीने सहकार्य करते. डब्लूटीए फ्युचर्स स्टार स्पर्धेत चोवीस खेळाडूंमध्ये तिची निवड झाली होती त्यात चौथ्या संघाचे नेतृत्व तिने केले. तिथे विजेतेपद जरी मिळाले नाही तरी अनुभव खूप मोठा मिळाला. नुकत्याच दिल्लीमध्ये झालेल्या ग्रेड चार स्पर्धेत तिने उपविजेतेपद मिळवत आपण फॉर्ममध्ये येत असल्याची साथ दिली.

पुण्यात यंदा डेव्हिस करंडक स्पर्धा बालेवाडीत आयोजित करण्यात आली होती, त्यात लिएंडर पेससह देशाचे सर्व मानांकित खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेने खऱ्या अर्थाने पुण्यात टेनिस संस्कृती रूजवली. सालसा आहेरसारख्या खेळाडूंनादेखील अशा स्पर्धा प्रेरणा देत असतात. थायलंडच्या आयटीएफ स्पर्धेत तिने जे उपविजेतेपद मिळवले होते तो सालसाच्या कारकिर्दीचा कळसाध्याय ठरला आहे. सालसाला घरातून पालकांचा पूर्ण पाठिंबा आहे आणि म्हणूनच ती कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करू शकत आहे. भारतासारख्या देशात दहावी आणि बारावीचा परीक्षा आल्या की पालकवर्ग आपल्या मुलांचे खेळ बंद करतात व अभ्यास एके अभ्यास करायला भाग पाडतात. याच कारणाने आपल्याकडे मड्रॉपआऊटमचे प्रमाण खूप जास्त आहे. परीक्षेचे दडपण घेत खेळाडू खेळाकडे पूर्ण दुर्लक्ष करतात व त्यात निघून जाणारे एक वर्ष त्यांच्या कारकिर्दीला 'फुलस्टॉप' देणारे ठरते. असे अनेक खेळाडू गुणवत्ता असूनही खेळापासून दूर गेलेले पाहायला मिळतात. नशीबाने सालसाला असे पालक मिळाले आहेत की ज्यांचा तिच्या खेळावर, गुणवत्तेवर पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच फेड स्पर्धेसाठी त्यांनी दहावीच्या परीक्षेलाही बाजूला सारले. हाच विश्वास एका सामान्य खेळाडूला महान खेळाडू बनवतो.

सचिनमुळे लहान मुले क्रिकेट खेळू लागली, सायना नेहवालमुळे मुली बॅडमिंटनमध्ये हातपाय मारायला लागल्या तशाच धर्तीवर सानिया मिर्झाकडे बघत सालसा सारख्या असंख्य मुली टेनिसकडे वळत आहेत आणि याच मुलींमधून देशाला सानिया मिर्झाची वारसदार सापडेल. सध्यातरी सालसा ज्युनिअर ग्रॅन्ड स्लॅम खेळताना दिसावी म्हणजे पुण्याचा टेनिस क्षेत्राला स्टार खेळाडू मिळेल, आणि मग प्रायेजकही या खेळाडूंकडे येतील. आता लक्ष्य, एमएसएलटीए यांच्याव्यतिरिक्त योनेक्स ही कं पनीही सालसाला सहकार्य करत आहे. एकदाका जागतिक स्तरावर सालसाचा प्रवेश झाला की तिच्यापुढे प्रायोजकांची रांग लागेल आणि त्याचवेळी ती पुण्याच्याच नव्हे तर देशाच्या टेनिसचे नवे आशास्थान बनलेली असेल.

# महिला अत्याचाराच्या खटल्यांसाठी विशेष यंत्रणा हवी : ॲड. उज्ज्वल निकम

साद प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवसेनेच्या उपनेत्या, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांचे स्त्री आधार केंद्र यांच्या वतीने पुण्यात 'सांगाती या प्रकल्पांतर्गत महिलांचे विशेष कायदे या विषयावर एक कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. गोऱ्हे, विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, सरकारी वकील उज्ज्वला पवार प्रमुख अतिथी होते.

महिला अत्याचारांच्या खटल्यांमध्ये जिल्हा न्यायालयाच्या निकालानंतर उच्च न्यायालयात दाद मागितली जाते. मात्र, तेथे खटला प्रलंबित राहिल्याने पीडितांना न्याय कधी मिळेल, याची शाश्वती नसते. त्यामुळे हे प्रलंबित खटले मार्गी लावण्यासाठी उच्च न्यायालयात विशेष यंत्रणा उभारली पाहिजे, अशी गरज ॲड. निकम यांनी व्यक्त केली.

निकम म्हणाले, महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना कठोर शिक्षा होऊन कायद्याचा वचक निर्माण व्हावा, यासाठी आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी सरकारी वकील करतात. मात्र, शिक्षा होण्यासाठी अधिक कालावधी लागत असल्यामुळे त्या शिक्षेचा मूळ उद्देशच हरवून जातो. हा कायद्याचाही पराभव आहे. अत्याचारपीडितेला तीन वेळा जबाब द्यावा लागतो. त्यामुळे फिर्यादीने जबाब आणि खटल्याच्या वेळी सांगितलेली घटना यामध्ये फरक पडण्याची शक्यता असते. त्याचा फायदा आरोपींचे वकील घेतात. आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी पोलीस तपासात सरकारी वकिलांना मार्गदर्शन करण्याची मुभा दिली गेली पाहिजे.

रामराजे निंबाळकर म्हणाले, पीडितेला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना घाबरूनच त्या तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे पीडित महिलांचा जबाब घेताना विशेष काळजी घेण्यात यावी. अत्याचाराच्या घटनेचा तपास अनेक वेळा योग्य रीतीने न झाल्यामुळे महिलांना न्याय मिळत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, निर्भया घटनेनंतर महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी तयार केलेल्या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होण्याची अत्यंत गरज आहे. कायद्यांमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. न्यायालयीतल प्रलंबित खटले मार्गी लागतील, यासाठी देखील उपाययोजना होण्याची गरज आहे. बाललैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये न्यायालयाची रचना ही बालकांसाठी अनुरूप असली पाहिजे. महिला शासकीय कर्मचाऱ्यांवर अत्याचार होतो तेव्हा त्या पीडित महिलेला रजा अथवा तत्सम सुविधांचा विचार होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी आयोगाच्या कामकाजाबाबत व आतापर्यंतच्या वाटचालीबाबत व स्त्री आधार केंद्राच्या वतीने करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांबाबत माहिती दिली. या वेळी ॲड. उज्ज्वला पवार यांनी म हिलांविषयी कायद्यांसदर्भात मार्गदर्शन केले. भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, ॲड. वैशाली चांदणे यांनीही मनोगत व्यक्त केले. महिला आयोगाच्या माजी सदस्या आशा मिरगे, रघुनाथ कुचिक, आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. अनिरुद्ध देशपांडे, डॉ. मीनाक्षी भोसले, मंगल खिंवसरा, झेलम जोशी, शुभा शमीम, ॲड. गणेश कवडे, अनुराधा सहस्रबुद्धे, सुनीता मोरे, रूपा शहा, वर्षा देशपांडे, मंगल चव्हाण, गौतम गालफाडे, नंदकुमार ढेकणे आदींनी भाग घेतला.



**पुण्यात स्त्री आधार केंद्राच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना रामराजे नाईक-निंबाळकर. समवेत ॲड. उज्ज्वला पवार, डॉ. मंजूषा मोळवणे, नीलम गोऱ्हे, ॲड. उज्ज्वल निकम.**

# शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन

महिलांच्या संरक्षणासाठी सुरू केलेल्या 'नो ॲप'चे उद्घाटन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्या हस्ते पुण्यात नुकतेच झाले. या निमित्ताने पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. ''राज्यातील सर्व महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिनसह अत्यावश्यक औषधांची पेटी सज्ज ठेवणार आहे,'' अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी दिली.


''महिलांच्या विषयावरील 'पॅडमॅन' चित्रपटाचे स्वागत करण्यात येत आहे. यातून समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल होईल, असा विश्वास यातून वाटतो. या विषयात महिला आयोगाने काम सुरू केले आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये सॅनिटरी पॅडची पेटी असली पाहिजे. त्यासोबत अत्यावश्यक औषधांची स्वतंत्र पेटी देण्याची सूचना राज्यातील महापालिका, जिल्हा परिषदांच्या शाळांना केली आहे. राज्यातील खासगी शाळांनी पेटी ठेवावी, असे आयोगाने सूचित केले आहे. महिलांच्या या विषयावर बोलण्यात मोकळेपणा येणार आहे. त्याचा चांगला उपयोग करून पुढे काम करता येईल'', असेही रहाटकर म्हणाल्या. सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करण्याबरोबर त्याची योग्य विल्हेवाट लावण्याकडे आयोगाने लक्ष दिले आहे. त्यामुळे याची उपलब्धता असलेल्या ठिकाणीच याची विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येत आहे. राज्यातील महिला कारागृहापासून याची सुरवात करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## राज्य सरकारची 'अस्मिता'

**रेल्वे स्थानक, बस थांबे, मॉल्समध्येही सॅनिटरी नॅपकिनसह औषधांची सुविधा उपलब्ध करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी खासगी संस्थांनीही पुढाकार घेतला पाहिजे. राज्य सरकारतर्फे 'अस्मिता' नावाचे सॅनिटरी पॅड उपलब्ध करण्यात येत आहे. त्याचा प्रसार आणि प्रचार करण्याची जबाबदारी राज्य महिला आयोगावर आहे, असे विजया रहाटकर यांनी सांगितले.**

# 'समाजाचा पुढाकारही आवश्यक'

''महिलांच्या सुरक्षेसाठी सक्षम कायद्याबरोबरच जागृत आणि संवेदनशील समाजाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. लहान मुले आणि महिलांच्या लैंगिक शोषणाबद्दल जनजागृती आणि त्याला प्राथमिक स्तरावरच प्रतिबंध या दोन्ही मार्गांचा अवलंब केला पाहिजे,'' असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी सांगितले.




पुण्यातील 'केईएम रुग्णालयाचे संशोधन केंद्र', बर्लिन इन्स्टिट्यूट ऑफ सेक्सॉलॉजी आणि भारतीय तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ यांच्यातर्फे 'नो ॲप'चे उद्घाटन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. केईएम रुग्णालयातील संशोधन संचालक डॉ. लैला गार्डा, बर्लिन येथील डॉ. क्लाउस बैअर, दक्षिण आशियातील 'बायर' कंपनीचे अधिकारी रिचर्ड व्हान डेर मेर्वे, डॉ. मोहन आगाशे, अभिनेते शशांक केतकर आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाचे निवृत्त महासंचालक दुर्गाप्रसाद कोडे या वेळी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या, ''या ॲपमुळे खूप फरक पडणार आहे, असा विश्वास वाटतो. कारण यापूर्वीचे काही ॲप्लिकेशन्स आहेत; पण मुलींना होणाऱ्या त्रासापासून वाचविण्यासाठी लोकांनाही अनेक पर्यायांची गरज आहे. हे ॲप्लिकेशन पोलिसांशी थेट जोडलेले आहे. त्यामुळे समाजातून असे लोक मुलींच्या रक्षणासाठी पुढे येत आहेत. त्याचा थेट फायदा संकटात असलेल्या मुलीला झाला पाहिजे, हे त्यातून होत आहे.''

### काय आहे 'नोॲप'?

'नो ॲप' महिलांवरील अतिप्रसंगाच्या घटनांचे प्रत्यक्ष ठिकाण शोधून, ते नोंदविण्याची प्रक्रिया आणि पद्धतींवर आधारित आहे. सध्याच्या मोबाईल तंत्रज्ञानामुळे हे सगळे सोपे झाले आहे. विनयभंगाचा धोका किंवा प्रत्यक्ष अतिप्रसंगाच्या घटनेमध्ये 'नो ॲप' वापरणाऱ्यांना संकट आले आहे किंवा धोका वाटतो, असा संदेश मोबाईलवरच्या एका 'आयकॉन' किंवा बटणाला स्पर्श करून क्षणार्धात पाठवता येतो. अशा इतर 'नो ॲप' असलेल्या जवळपासच्या परिसरातील मोबाईलधारकांनाही हा संदेश क्षणार्धात मिळेल, शिवाय अशा घटनेचे ठिकाणही कुठे आहे ते समजेल. या कार्यपद्धतीमुळे समाजाचा वचक वाढून अशा घटनांवर नियंत्रण येईल. 'प्रतिसाद' या ॲपच्या माध्यमातून 'नो ॲप' हे महाराष्ट्र पोलिसांबरोबर सहकार्य करत आहे. अशा रीतीने प्रत्येक संकटाचा इशारा देणारा संदेश घटनेच्या ठावठिकाण्यासाहित पोलिसांना मिळेल. यामुळे पोलिसांना गस्तीवरच्या अधिकाऱ्यांना नेमक्या ठिकाणी लगेचच पाठवणे शक्य होईल.



# महिलांच्या मानहानीविरोधात महिला आयोगाचे सक्रिय पाऊल

**साद प्रतिनिधी**

सामाजिक माध्यमांतून (सोशल मीडिया) महिलांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या अवमानकारक, मानहानीकरक शेरेबाजी आणि अश्लील वक्तव्ये अथवा टीका करण्याच्या प्रकारांना रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग राज्य सरकारला लवकरच उपयुक्त सूचना असलेला अहवाल सादर करणार आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी दिली.

या संदर्भात रहाटकर यांनी ६ फेब्रुवारी रोजी राज्याच्या महिला आणि बाल कल्याण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेतली आणि त्यानंतर घोषणा केली. आयोगाच्या अहवालाचा सरकार गांभीर्याने विचार करेल आणि त्यातील सूचनांची अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही महिला आणि बाल कल्याण मंत्री पंकजा मुंडे यांनी रहाटकर यांना दिली.

सामाजिक माध्यमांद्वारे महिलांना त्रास देण्याचे, त्यांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, अशी वक्तव्ये आणि शेरेबाजी करण्याचे प्रकार अलीकडे वाढत आहेत. नोकरदार महिला, खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला आणि अगदी महिला लोकप्रतिनिधींकडूनही या संदर्भातील तक्रारी आयोगाकडे सातत्याने येत आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी योग्य पावले उचलण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे, असे आयोगाला वाटते. त्यामुळेच तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या समितीकडून या संदर्भात अभ्यासपूर्ण अहवाल तयार करून तो राज्य सरकारला लवकरात लवकर सुपूर्द केला जाईल, असे रहाटकर यांनी सांगितले.

आयोगाचे हे पाऊल अभिनव असे म्हणावे लागेल. समाजात वावरताना महिलांना होणारा त्रास रोखण्याच्या दृष्टीने ते अत्यंत महत्त्वाचे आहे. ही नियमावली अस्तित्वात आल्यानंतर असभ्य भाषेतील वक्तव्यांना चाप बसू शकेल.

---

# गडचिरोलीतील बलात्कारप्रकरणाची आयोगाकडून दखल

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील मोहरी येथील अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणाची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षकांना तत्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता सत्यता पडताळून पोलिसांकडून झालेल्या कारवाईचा अहवाल मागविण्यात आला आहे.



गडचिरोली जिल्ह्यातल्या मोहलीमध्ये पाचवीत शिकत असलेल्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला जात पंचायतीने १२ हजार रुपये दंड आणि गावाला बकऱ्याच्या मटणाचे भोजन देण्याची शिक्षा ठोठावली होती. वृत्तपत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार, मुलीच्या अब्रूचे धिंडवडे काढणाऱ्या आरोपीकडून मटण पार्टी घेणाऱ्या या जात पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे, अशी मागणी स्थानिक स्वयंसेवी संघटनांनी केली. मुलीवर अत्याचार झाल्याची तक्रार पालकांनी केल्यानंतर जात पंचायतीने आरोपीला दंड ठोठावला. त्यानुसार आरोपीने गावजेवण दिलं, पण पीडितेच्या कुटुंबीयांना दंडाची रक्कम दिली नाही. त्यानंतर पालकांनी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदवला.

# औरंगाबादला पार पडली विभागीय परिषद

पंचायत राज्य संस्थांना बळकट करणारया ७३व्या आणि ७४ व्या राज्यघटना दुरुस्तीस पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने सोमवार, दि. २२ जानेवारी रोजी औरंगाबादमध्ये विभागीय परिषद आयोजित केली होती. तिचे उद्धाटन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते झाले. या परिषदेत प्रामुख्याने लोकशाही निवडणूक आणि सुशासन यांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. गेल्या पंचवीस वर्षांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी काय मिळविले आणि काय बाकी आहे, याचे सिंहावलोकन करण्यात आले. उदघाटनाच्या भाषणामध्ये अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पंचायत राज्य संस्थांचा सर्वंकष आढावा घेतला. सरकारे आणि या संस्था यांच्यातील आर्थिक अन्योन्य संबंधांपासून ते 'उज्ज्वला', 'मुद्रा'यासारख्या सुशासन योजनांपर्यंतचा वेध त्यांनी मांडला. एकूणच ही परिषद विचारांना चालना देणारी ठरली. विभागीय आयुक्त पुरूषोत्तम भापकर, औरंगाबादचे महापौर नंदकुमार घडोले, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा देवयानी पाटील- डोणगावकर, जिल्हाधिकारी नवलकिशोर राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे, डी. एम. मुगळीकर, मधुकरराजे अर्दड, के.एम. नागरगोजे, वर्षा ठाकूर- घुगे, पारस बोथरा यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीने, पुढाकाराने झालेल्या या परिषदेचे फलित नक्कीच चांगले असेल.



**औरंगाबाद येथे पार पडलेल्या विभागीय परिषदेवेळी दीपप्रज्वनल करताना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर. समवेत पुरूषोत्तम भापकर, नंदकुमार घडोले, देवयानी पाटील- डोणगावकर, नवलकिशोर राम, डॉ. बी.ए. चोपडे, डी. एम. मुगळीकर आदी.**

# न्यूझीलंडच्या पंतप्रधान घेणार मातृत्व रजा

सन २०१७ मधील ऑगस्ट महिना होता. न्यूझीलंड या आपल्यापासून सूदूर असलेल्या देशातील लेबर पक्षाच्या नेतेपदी ३७ वर्षांच्या जेसिंडा आर्डन यांची निवड झाली होती. त्या लवकरच न्यूझीलंडच्या पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेणार होत्या. टीव्ही वाहिनीवर त्यांची मुलाखत सुरू असताना त्यांना प्रश्न विचारण्यात आला, एखाद्या देशाच्या पंतप्रधानाने पदावर असताना प्रसूतीसाठी रजा घेणे कितपत योग्य आहे? क्षणाचाही विलंब न लावता आर्डन यांनी उत्तर दिले, सन २०१७मध्ये एखाद्या महिलेला असा प्रश्न विचारला जाणे हेच अयोग्य आहे. मूल कधी होऊ द्यायचे हा सर्वस्वी त्या महिलेचा प्रश्न आहे. त्यावरून तिला नोकरी द्यायची की नाही किंवा तिला नोकरीच्या संधींवर कोणताही परिणाम होता कामा नये.



**जेसिंडा आर्डन**

ही मुलाखत झाल्यानंतर दोन महिन्यांनी ऑक्टोबरमध्ये आर्डन न्यूझीलंडच्या सर्वांत तरुण पंतप्रधान बनल्या. आपण आई होणार असल्याची घोषणा त्यांनी गेल्या आठवड्यात केली. तसेच, आपण फक्त सहा आठवड्यांचीच प्रसूती रजा घेऊ, असेही त्यांनी जाहीर केले आहे. त्यानंतर त्यांचा लिव्ह इन जोडीदार क्लार्क गेफर्ड हा बाळाचे संगोपन करण्यासाठी घरी राहणार आहे. आपल्याकडे जिथे अजूनही स्त्री चूल आणि मूल यातून पूर्णपणे बाहेर पडू शकलेली नसलेल्या देशात हे उदाहरण गैरलागू किंवा 'दुरून डोंगर साजरे' प्रकारचे वाटू शकेल. पण, त्यातून मिळणारी प्रेरणा नक्कीच वैश्विक आहे. प्रसूती या कारणामुळे स्त्रियांच्या रोजगारसंधी आपल्याकडे कमी होतात, हे समाजातील वास्तव आहे. न्यूझीलंड अथवा पाश्चात्त्य देशच या बाबत प्रागतिक आहेत, असे नाही. लोकशाहीऐवजी धर्मांधांची पाठराखण करणारा आपला शेजारी देश पाकिस्तानही या बाबतीत मागे नाही. पाकिस्तानच्या दिवंगत पंतप्रधान बेनझीर भुट्टो यांनी पदावर असतानाच १९९० मध्ये अपत्याला जन्म दिला होता. त्यामुळे किमान यापुढे तरी प्रसूती या कारणावरून कोण्या महिलेची रोजगारसंधी हिरावली जाऊ नये.

# स्त्रीच्या शरीरावर फक्त तिचाच हक्क

काही दिवसांपूर्वी एका मोठ्या राजकीय पक्षाचे नेते असलेल्या एका खासदारांनी महिलांविषयी असभ्य उद्गार काढले होते. 'महिलांची ना म्हणजेच त्यांचा होकार असतो. त्यांचा पाठपुरावा करावा लागतो,' अशा आशयाचे उद्गार त्यांनी काढले होते. त्याव मोठा वादही झाला.


दोन वर्षांपूर्वी २०१६मध्ये अनिरुद्ध रॉय चौधरी या दिग्दर्शकाचा पिंक नावाचा सिनेमा आला होता. त्यात एका बलात्काराचा प्रयत्न केल्याबद्दल एका तरुणावर खटला भरला जातो. खटल्याचे न्यायालयातील चित्रण दाखविण्यात आले होते. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद कसे होतात आणि अंतिमतः ती मुलगी खटला जिंकते. यात एक ज्येष्ठ वकील (अमिताभ बच्चन) मुलीच्या बाजूने खटला लढवतात. आरोपीच्या बाजूने असा युक्तिवाद केला जातो की, तिने मला संकेत दिले होते. तिची ना म्हणजे होकार होता. त्यावर पीडित मुलीचे वकील उसळून ठामपणे सांगतात, नो मीन्स नो! एखादी मुलगी नाही, म्हणते तेव्हा त्याचा अर्थ नाही, असाच घेतला पाहिजे.

हे सगळे आता आठवण्याचे कारण म्हणजे दिल्लीतील एका न्यायालयाने नुकताच दिलेला एक निकाल. स्त्रीच्या शरीरावर पूर्णपणे तिचाच अधिकार आहे. तिच्या संमतीशिवाय कोणीही तिच्या शरीराला स्पर्श करू शकत नाही, असा निकाल न्या. सीमा मायनी यांनी दिला.

या निकालाची थोडक्यात गोष्ट अशी - मूळचा उत्तर प्रदेशातील राहणारा छवी राम नावाचा व्यक्ती दिल्लीत आला होता. उत्तर दिल्लीतील मुखर्जी नगर परिसरातील बाजारात गर्दीचा गैरफायदा घेत त्याने एका नऊ वर्षांच्या मुलीला असभ्य स्पर्श केला. त्या मुलीने तातडीने ही गोष्ट आपल्या आईला सांगितले. आईने इतर काही जणांच्या मदतीने छवी रामला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना होती २५ सप्टेंबर २०१४ रोजीची.

न्यायालयात छवी रामच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, हे कृत्य करणारा तो मी नव्हेच. खरा आरोपी पळून गेला. पोलिसांनी मला या गुन्ह्यात नाहक अडकवले आहे. मात्र, त्याचा युक्तिवाद अमान्य करीत न्यायालयाने त्याला दोषी ठरवले. मात्र, या निकालपत्रात न्यायालयाने व्यक्त केलेली मते अत्यंत महत्त्वाची आहेत.

एखाद्या महिलेचे शरीर सर्वस्वी तिचे असते आणि तिच्या शरीरारवर पूर्णपणे तिचाच हक्क असतो. इतर कोणालाही तिच्या इच्छेशिवाय तिच्या शरीराला स्पर्श करण्याचा कोणताही हक्क नाही, मग हेतू काहीही असो. मात्र, पुरुषांकडून स्त्रियांच्या खासगीपणाच्या हक्काचा आदर केला जात नाही. एखाद्या स्त्रीला असभ्य स्पर्श करताना किंवा आपली लैंगिक भूक शमविण्यासाठी तिच्यावर हल्ला करताना पुरुष कधीही एक क्षण थांबून दुसऱ्यांदा विचार करीत नाहीत. लैंगिकदृष्ट्या विकृत असलेले हे लोक महिलांवर हल्ला केल्यानंतर उत्तेजित होतात. त्यांना एखाद्या महिलेच्या किंवा असहाय लहान मुलीच्या खासगीपणाच्या अधिकाराचे अजिबात भान राहात नाही.



त्यामुळे छवी रामला दयामाया न दाखवता न्यायालयाने दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला.

भारतासारख्या वेगाने विकसित होत असलेल्या, तंत्रज्ञानात आघाडीवर असलेल्या देशात स्त्रियांच्या बाबतीत अशा घटना घडणे लाजिरवाणे आहे, असेही मत न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयाचा हा निर्णय एखाद्या खटल्यापुरता मर्यादित न राहता तो समाजात तळागाळापर्यंत झिरपला पाहिजे. त्याचे पालन झाले पाहिजे, याची जबाबदारी आता समाजालाच घ्यावी लागणार आहे. त्यासाठी गरज आहे, जनजागृती आणि स्त्रियांच्या हक्कांचे भान बाळगण्याची.

# आयोगाची घटना, अधिकार व कामे

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९-ब, ४२-ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com